## कर्मवीर विठ्ठल रा. शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज



# शिवराज

## १९७४-७५

**संस्थापक:**

मा. बाळासाहेब माने
जि. प. अध्यक्ष - कोल्हापूर.

**प्र. प्राचार्य:**

डॉ. सु. गो. गोकाककर

**प्रमुख संपादक:**

प्रा. प्रसन्नकुमार पाटील

Scanned with CamScanner

कर्मवीर वि. रा. शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज

# शिवराज कॉलेज

१९७४-७५

– अध्यक्ष –

मा. बाळासाहेब माने

– प्रमुख संपादक –

प्रा. प्रसन्नकुमार पाटील

– विद्यार्थी प्रतिनिधी –

श्री. सुरेश कंग्राळकर

Scanned with CamScanner

# शिवराज कॉलेज

गडहिंग्लज.

**प्रकाशन दिनांक, १० मे १९७५**

मुखपृष्ठ कल्पना —
प्रा प्रसन्नकुमार पाटील

मुखपृष्ठ —
मयूर आर्टस्, कोल्हापूर.

जाहिरात विभाग --
प्रा. प्रसन्नकुमार पाटील

जाहिरात सहकार्य —
संस्थापक मा. बाळासाहेब माने
मा. धोंडीराम कदम
मा. नागापाण्णा बटकडली

मुद्रक --
रांगणेकर
शकुंतला प्रिंटिंग प्रेस, गडहिंग्लज

सल्लागार --
प्र. प्रा. डॉ सु. गो गोकाककर

ब्लॉक मेकर्स --
उदय व लक्ष्मी प्रोसेस, कोल्हापूर.

ऋणनिर्देश --

मा. बाळासाहेब माने
जि. प. अध्यक्ष कोल्हापूर.
प्र. प्रा. डॉ. सु. गो. गोकाककर
मा धोंडीराम कदम
मा. नागापाण्णा बटकडली
प्रा. दुंडगेकर
प्रा बन्ने
प्रा. केसरकर
श्री. नाळे

Scanned with CamScanner

# आमचे कुलगुरु



बॅ. पी. जी. पाटील

Scanned with CamScanner

आमचे विनयशील

प्रभारी प्राचार्य



डॉ. सु. गो. गोकाककर

Scanned with CamScanner

तडफदार नेतृत्व



संस्थाध्यक्ष मा. बाळासाहेब माने

Scanned with CamScanner

# शिवराज महाविद्यालय
# गव्हर्निंग कौन्सिल



डावीकडून – १) बी. एस्. मोहिते २) प्रा. एन्. आर्. दुंडगेकर ३) श्री. वळीराम देसाई ४) श्री. धोंडीराम पताडे ५) प्रा. व्ही. एस् बन्न ६) ॲड. श्रीपतराव शिंदे ७) डॉ. जी. वी. सावंत (उपाध्यक्ष) ८) श्री. धोंडीराम कदम (उपाध्यक्ष) ९) मा. बाळासाहेब मान (अध्यक्ष) १०) मा. अमृतकाका देसाई ११) श्री. वाय्. आर. तथा बाबुराव मोहिते १२) श्री. गणपतराव देसाई १३) प्र. प्राचार्य डॉ. सु. गो. गोकाककर १४) मा. शं. तु. देसाई १५) श्री. बापूसाहेब फडणीस १६) श्री. शंकरराव चव्हाण

Scanned with CamScanner

# मराठी विभाग



" निळे आकाश नितळच असते. नितळ डोळयानाच आकाशाचे नितळपण दिसते. आकाशांत ढगे येतात आणि जातात. पण आकाशाचा नितळपणा लोपत नाही. आपले डोळे सुंदर तर सारे जगच सुंदर . . . ! "

— अनाम

Scanned with CamScanner

कर्मवीर वि. रा. शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज

# शिवराज महाविद्यालय

## लोकल गव्हर्निंग कौन्सिल

चेअरमन— मा. बाळासाहेब उर्फ राजाराम शंकरराव माने
जि. प. अध्यक्ष, कोल्हापूर.

व्हा. चेअरमन-- १) मा. डॉ. जी. पी. सावंत
२) मा. घोंडीराम सं. कदम

सेक्रेटरी— प्र. प्राचार्य डॉ. सु. गो. गोकाककर

सदस्य— १) मा. नागापाण्णा गु. बटकडली,
सदस्य जि. प. कोल्हापूर.
२) मा. यशवंत रा. मोहिते B. Sc. (Hon.)
३) मा. धोंडीराम पताडे
४) मा. गणपतराव वा. देसाई
५) मा. शंकरराव वा. चव्हाण
चेअरमन, शिवाजी बँक गडहिंग्लज.
६) मा. शंकरराव तु. देसाई
राष्ट्रपती पारितोषिक विजेते.
७) मा. श्रीपतराव दि. शिंदे, B. A. LL. B. Advocate.
८) मा. व्ही. व्ही. फडणीस B. A.
९) मा. प्रा. एन्. आर. दुंडगेकर M. A. LL. B.
१०) मा. प्रा. व्ही. एस. बन्ने M. A.
११) मा. बी. एस्. मोहिते B. Com.

Scanned with CamScanner

# वज्राघातमधील "रामराजा"

कु. एस्. एन्. कुलकर्णी
बी. ए. भा. ३

फूल कसे उमलते हे सांगणे वेगळे आणि फुलाचे स्वयंभू उमलणें वेगळे. तसेच कादंबरीतील व्यक्तिदर्शन स्वयंभू उमलणाऱ्या फुलाप्रमाणे पाहिजे. ' वज्राघात ' मधील रामराजाचे व्यक्तिचित्रण हरिभाऊ स्वयंभू उमलणाऱ्या फुलाप्रमाणेच म्हणजेच त्याच्या वृत्ती, प्रवृत्ती, वैचारिक भावनिक आंदोलने, कृती यांच्यातून साकार करतात. कथानकाचा विस्तार अधिक असेल तर कादंबरीकाराला पात्राचे समृद्ध चित्रण करता येते. हरिभाऊंनी ' वज्राघात ' हे ३०–३५ वर्षांच्या विस्तीर्ण कालखंडावर गुंफलेले कथानक आहे. त्यामुळे त्यांना रामराजाच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन फुलवून, उमलून दाखविता आले. रामराजाचे चित्रण करतांना त्याच्या अंतरंगात शिरून ताण, संघर्ष, आंदोलने तसेच त्याच्या मनाचे विविध कंगोरे हरिभाऊ चितारतात. रामराजाचे चित्र रेखाटण्यास त्यांनी आपली सारी कलात्मक शक्ती पणाला लावली आहे.

व्यक्तीच्या ढोबळ वर्णनापेक्षा त्याच्या अंतरंगाचे पदर अधिक उलगडून दाखविण्यात लेखकाचे कौशल्य दडलेले असते. पण ते कौशल्य दाखवितांना गोफ हा अनेक रंगी दोऱ्या एकत्र आल्यानेच सुंदर दिसतो, तद्वतच व्यक्तीच्या वर्णनाचे आहे. कथानकाची वीण ही शोभादर्शकाप्रमाणे पाहिजे आणि ते हरिभाऊंनी आपल्या कलात्मकतेने केले आहे. हरिभाऊंचे झुकते माप रामराजाकडे आहे. हरिभाऊंनी जे जे पात्र रेखाटन केले त्याचे पहिले सूत्र त्यांना माणूस रेखाटा–वयाचा होता. हरिभाऊंच्या कालखंडात मानसशास्त्र आजच्या इतके प्रगतावस्थेला पोहोचलेले नव्हते, तर ते बाल्यावस्थेतच होते. असे असतांनाहि हरिभाऊंनी रामराजाच्या रुपाने माणूस उभा केला आहे. तो त्यांच्या कल्पकतेने, कलात्मकतेने असेच म्हणावे लागेल. हरिभाऊंनाहि एक विशाल जीवनपट चितारून जीवनाचा सखोल आशय व्यक्त करावयाचा होता आणि त्यासाठी त्यांनी विजयनगरच्या उत्कर्षापकर्षाचे भव्यभीषण कथानक निवडले. माणूस कधी सरळ जगत नाही, तर तो वक्रतेनेच आपले जीवन कंठत असतो. पण त्यात एक प्रकारची लय असते. अशा लयबद्ध वक्रतेतच खरे सौंदर्य असते. " वाचकाच्या दृष्टीने विस्कळीत जीवनात तो सुसंगती शोधत असतो आणि अशा विस्कळीत जीवनातून सुसंगती शोधण्या–साठी कलावंताची आवश्यकता असते. " यासाठी हरिभाऊंनी रामराजा मेहेरजानला पळवून आणतो व कुंजवनात ठेवतो येथून कथानक आरंभिलेले आहे. ज्या कुंजवनात रामराजा मेहेरजानबरोबर प्रीतीसौख्य अनुभवतो तेथेच तिला तो टाकतो आणि तिच्या विरहाने तो तडफडतो. ही रामराजाच्या आयुष्यातील दोन टोके हरिभाऊ दाखवितात

रामराजा समोर साकार करतांना हरिभाऊंना माणसाच्या व्यक्तिमत्वाचे फार मोठे मर्म गवसले. जीवनात सुसंगती येते, त्या सुसंगतीचे रूप हे विस्कळीत, अनेकांगी व अनेक केंद्री असते. माणसाला केवळ पाऱ्याचीच उपमा देता येईल. माणूस म्हणजे देवाला जागेपणी पडलेले स्वप्न होय. तो रेखीव, आकृतिबद्ध

Scanned with CamScanner

जीवन जगत नाही, तर त्याच्या विस्कळीत जीवनात कोणत्या आकृति सापडतात ते आपण शोधावयाचे असते. हे तत्व हरिभाऊंना गवसले होते. त्यामुळे दोन कथावस्तूंची गुंफण त्यांना कलात्मकतेने घालता आली.

मेहेरजानवर वाघ हल्ला करतो तेंव्हा तो स्वतःचा जीव धोक्यात घालून तिला वाचवितो ते परोपकारी वृत्तीने. पण हे करतांना मेहेरजान त्याला आवडली नसती तरच नवल! तो आपले कर्तव्य बजावतो. पण त्याचवेळी त्याचे मन मेहेरजानवर लुब्ध, मोहित होते. ते मानवाच्या सहजातवृत्तीमुळे. शूरत्व व शृंगारित्व ही दोन टोके रामराजाच्या ठिकाणी एकाच वेळी येतात. बेशुद्ध स्थितीत मेहेरजानला कुंजवनात आणणारा व तिच्याकडे प्रेमाची याचना करणारा रामराजा इथे स्पष्ट होतो. हा रामराजा मोहक, दिलदार, रसिक, महत्त्वाकांक्षी व मुत्सद्दी आहे एवढेच नव्हे तर तो तिला गांधर्व विवाहाचे आश्वासन देतो. वास्तविक प हता 'वज्राघात' मध्ये मुसलमान व हिंदु हेच वैरत्वाचे कारण असते आणि मेहेरजान मुसलमान स्त्री-रामराजा हिंदु असे असूनहि तो तिला वचन देतो. म्हणजेच त्याच्या ठिकाणी धर्मनिरपेक्षता आहे. त्याला गायनकलेचेहि ज्ञान आहे. त्याला जयदेवाच्या अष्टपदीची आठवण होते आणि त्यातून त्याच्या मनातील शृंगारभाव आलंबित पावतो

विजयनगरमध्यें त्तिरुमल्लराय अलि अदिलशहास आमंत्रण पाठवून त्याला बोलावतो व त्याचा सत्कार करतो आणि जेंव्हा त्याला खंडणी देऊन परत पाठवितो तेंव्हा रामराजातील महत्त्वाकांक्षा पेट घेते. इथे त्याच्या स्फोटक प्रेरणांना वाव मिळतो आणि या स्फोटक प्रेरणेपायीच तो मेहेरजानला टाकतो कोणतीहि प्रेरणा माणसाला घेरून टाकते तेंव्हाच त्याला तो बळी पडतो. एका हिंदु साम्राज्याच्या उलथापालथी घडतांना त्याचा परिणाम रामराजावर होतो व तो मेहेरजानला विसरतो हे साहजिकच आहे. सौंदर्य व पराक्रम या पुरुषी स्वभावाच्या दोन तऱ्हा आहेत. माणसाची भूक अनेकांगी असते आणि त्याला रामराजा तरी कसा अपवाद ठरणार? रामराजा दिवाण बनतो, सरदार बनतो, पुढे सम्राट बनतो इथेच त्याच्यातील विलक्षण वेगळा माणूस दिसतो. माणसाचे जीवन हे टिंबेत विराम पावत नाही ते अनेक टिंबांनी बनत असते. जबरी महत्त्वाकांक्षा व प्रेम यांच्या कैचीत सापडल्यामुळे तो इथे थांबत नाही.

माणसाला माणसाचे मोल हे त्याला तो माणूस दूरावल्यावरच कळत असते. तो मेहेरजानला विसरत नाही. "तू गेलेली असतेस तेंव्हा तू खरंच गेलेली नसतेस, तू गेलेली असतेस तेंव्हा तू सर्वत्र भरून भरून उरलेली असतेस." अशा स्वरूपात मेहेरजानचे रूप, आठवणी त्याला घेऊ लागतात. मधल्या काळात पडदा पडतो. पुन्हा मेहेरजान त्याच्या जीवनात येते व पुन्हा त्याच्या जीवनाला एक प्रकारची उतरती कळा लागते. पण ही उतरती कळाच रामराजाच्या व्यक्तिमत्वाला कलात्मकतेचे मोल प्राप्त करून देते. माणसाची तृप्ती ही त्याच्या अतृप्तीला जन्म देत असते. हे शाश्वत सत्य हरिभाऊंनी रामराजाच्या माध्यमातून रेखाटले आहे. सारे रामराजाचे जीवन मेहेरजानने झाकाळले आहे. रामराजाची खरी प्रेरणा प्रेमिक हीच म्हणावी लागेल. विजयनगरचे साम्राज्यपद हे अनुषंगीक असेल, तो एक मुखवटा असेल आणि ती भूमिका क्षणापुरतीच होती असे रामराजाचे उत्तर आयुष्य पाहिल्यावर म्हणावे लागेल. मेहेरजानवर तो लुब्ध होतो ते कदाचित तिच्या सौंदर्यावर भाळून असेल किंवा ते त्याचे वयच असेल.

प्रेम आणि सत्ता या दोहोतला विरोध दोन कथावस्तूंच्या सुंदर गुंफणीतून होतो आणि जीवनात त्याला व्यापकत्व प्राप्त होते. प्रेम व सत्ता या दोहोंचे तर्कशास्त्र वेगळे असते. रामराजा केवळ सत्तेसाठी मेहेरजानच्या प्रीतीचा त्याग करतो. रामराजा तर सत्ता प्राप्तीसाठी प्रेमाला झुगारतो मेहेरजानला प्रेमनिष्ठूर म्हणून दोष देतो. या सर्वातून त्याचे करारी व स्वभिमानी व्यक्तित्व साकार होत नाही. दुबळा, अहंमन्य, स्वार्थी, सुखलोलुप व भावविवश रामराजा उभा राहतो. मेहेरजानच्या जाण्याने त्याच्या जीवनात निर्माण झालेली पोकळी त्यास दिसते व तो पुष्करिणी-भोवती अतृप्त आल्याप्रमाणे घोटाळत राहतो. पण पुढे सत्ता मिळाल्यावर तो मेहेरजानच्या प्रेमासाठी तडफडतो. प्रेमाच्या याचनेत, तडफडण्यात सौंदर्य असते.



Scanned with CamScanner

खऱ्या प्रेमात मालकी हक्काची भावना नसते. रामराजाच्या प्रेमात राजकारणातील कूट नीती दिसून येत नाही. याचना करून तो मेहेरजानला अस्वस्थ करतो. तेंव्हाच तिने विचार करावयास हवा होता की, हे प्रेम सफल होईल का ? पण तसा विचार तिने न केल्याने तिच्या प्रेमाचे रूपांतर पुढे सूडात होते. ज्याअर्थी ती प्रथम रामराजाच्या प्रेमाला साथ देते त्याअर्थी पुढचे सारे प्रसंग घडविण्यास तीच जबाबदार ठरते. खिन्नता, उदासवृत्ती, पूर्व आठवणीत रममाण होऊन त्यातच रंगण्याची वृत्ती, उसासे, अश्रु हे सारे रामराजाच्या प्रेमात आहे.

रणमस्तखानला जेंव्हा तो पाहतो तेंव्हा त्याच्या मनात विलक्षण थरारी ( Thrill ) निर्माण होते. त्याचे भावनीक मन विलक्षण आंदोलने घेऊ लागते. असे का व्हावे हे त्याचे त्यालाच कळत नाही. रामराजा तिथे रामराजा रहात नाही, तर बाप म्हणून त्याच्यापुढे उभा राहतो. इथे त्याच्यातील प्रेमिकाची भूमिका संपून बापाची भूमिका तो घेतो. तो पुत्र लोभाने वेडावून जातो तो त्यात आंतरिक धागे होते म्हणूनच. अखेर रक्त रक्ताला ओढत असते हेच खरे. हे सारे रामराजाच्या रक्ताने ओळखले होते.

" व्यतिषजति पदार्थान् अनंतएकोऽपि हेतुः ।
न खलु बहिरुपाधिन प्रीतयः संश्रयन्ते ।। "
(भवभूतीन्तररामपरिग)

पुत्र प्रेमाच्या आहारी जाऊन सत्तेसाठी जी जागरूकता ठेवावी लागते ती तो विसरतो. जीवनात प्रेम आणि सत्ता ही नेहमी परस्पर विरोधी असतातच असे नाही. प्रेम आणि सत्ता यांच्या भेसळीतून निर्माण होणारा अर्थपूर्ण अनुभव हरिभाऊ रामराजाच्या रुपाने 'वज्राघात' मध्ये साकार करतात. रामराजाच्या प्रेमाची परिणती अखेर वात्सल्यात होते. " मानवी भावनांची गुंतवळच अशी असते, की त्याची उकल करणेच अत्यंत कठिण असते. संघटना, घटना, विघटना यांची गुंतवळ तर्काच्या कात्रीने सोडविता येत नाही. ती गुंतवळ सोडविण्यासाठी भावना हे एकमेव साधन आहे." जीवनातील गुंतवळ ही भावनेने आकलन करून घेता येते. कारण मनुष्य जगतो तो भावनेवर. शृंगार व प्रेमरस हे दोन्ही रामराजाचे गुण हरिभाऊंनी अति सुंदरतेने रेखाटले आहेत. वात्सल्यप्रेम आणि भक्ति यांना विशिष्ट लक्ष्मणरेषा आहे. रामराजाची वात्सल्याची बाजू ही आंधळ्या धृतराष्ट्रासारखी आहे. वात्सल्य असणे हे पाप नाही तर त्या वात्सल्याला बळी पडणे हे पाप आहे. सुजाणपण नाही. भान नाही असे हे आंधळे काव्यात्म प्रेम आहे रामराजाचे !

रामराजाच्या व्यक्तित्वाचा पिंड असा होता, की जे आवडेल त्यात झोकून घेणे. रणमस्तखानाच्या वात्सल्यात रामराजा झोकून देतो. स्वतःला झोकून देण्यात व्यवहारी चतुराई, नागरकुशलता नसते. रामराजा विशिष्ट ध्यासात प्रत्येक ठिकाणी स्वतःला झोकून देतो. तडजोड, व्यावहारिकता ही सामान्य माणसाची प्रवृत्ती. पण रामराजा हा सामान्य नाही, तो एक असामान्य कोटीला पोहोचलेला सामान्य माणूस होता ज्या ज्या क्षणी ज्या ज्या भावनांचा उद्रेक होईल त्या त्या वेळी स्वतःला झोकून घेण्याची वृत्ती रामराजाची आहे. रणमस्तखान जवळ नसतांना तो अत्यंत कातर व्हावयाचा तो वत्सल प्रेमाने. वास्तविक पाहता त्याला तो आपलाच मुलगा आहे हेहि माहित नसते. तसेच त्याचे पितृहृदय थरथरते. हरवले ते गवसले या कल्पनेने, प्रेमविरहाने होरपळलेले त्याचे मन पुत्रवात्सल्याच्या झऱ्याने पुनः टवटवीत होऊ पाहते. हे सुख आपणास घेऊन बुडणार याची कल्पनाहि त्यास नसते. मेहेरजानला टाकतांनाहि तो इतका दुःखी होत नाही. पण नूरजहानच्या शापवाणीने कातर होतो. कुणापुढेहि लीन न होणारा रामराजा रणमस्तखानापुढे लीन होतो. शत्रुला जबर पाणी पाजणारा रामराजा केवळ आपल्या अहंमन्यतेने धुळीला मिळतो. हे जरी इतिहासात खरे असले तरी मानवी जीवनात तो पुत्रवात्सल्याने नामोहरम होतो. आतापर्यंत न गवसलेला वात्सल्याचा झरा रणमस्तखानला पाहून वर उफाळून येतो व त्यापुढे विवेक, बुद्धी, विचार, सारासार विचक्षणा शक्ती सर्व लोप पावते हे मानवी जीवनाचे सारसर्वस्व हरिभाऊ रामराजाच्या परस्पर विरोधी स्वभावचित्रणातून दाखवून देतात.



Scanned with CamScanner

मेहेरजानच्या संबंधात रामराजा दिसतो तो विरही आणि त्याचा तो विरहहि विप्रलंबी विरहाचा शृंगार आहे. अतीव हळूवारपणा, हळवेपण, औदासिन्य, उलघाल ही सारी लक्षणे त्याच्या विरहात आहेत. रणमस्तखानच्या संबंधात घरातील वृद्ध माणूस ज्याप्रमणे वायफळ बडबड करतो त्याप्रमाणे रामराजा इथे वागतो. केवळ बडबड करतो पण त्या बडबडीचा पुढे काय परिणाम होईल याचा तो विचार करीत नाही त्याच्या मनावरील ताबा सुटलेला आहे. त्यामुळे तो लगाम सुटलेल्या घोड्याप्रमाणे वागतो. रामराजाचे सारे उत्तर आयुष्य पश्चातापात जाते. त्याला चूक करतांना भान नसते, पण ती चूक कळून आल्यावर त्याला पश्चाताप होतो. पश्चातापाने पापे धुतली जातात. पण त्याच्या पापाचे प्रायश्चित अखेर त्याला मिळतेच. रामराजाचा हा पराभव कोरडा नाही तर तो कार्यकारणभावाची सुसंगती घेऊन येतो. रामराजाला सम्राटपद मिळते. पण तरीहि त्याला सुख मिळत नाही. रित्या पात्रात ज्याप्रमाणे कितीही भर घातली तरी ते भरत नाही त्याप्रमाणे रामराजा आहे. इतके सर्व करून मला काय मिळाले? हा रामराजा स्वतःला प्रश्न विचारतो. रामराजाला खरे सुख मिळते ते ३५ वर्षांपूर्वी मेहेरजानच्या सहवासातच, अशी तो स्वतः कबुली देतो

राज्यतृष्णा व प्रेमतृष्णा या दोन्ही गोष्टींना कवटाळू पाहणाऱ्या रामराजाच्या हाती काहीच लागत नाही. राज्यतृष्णा संपते पण प्रेमापायी, आपुलकीच्या भावनेपायी त्याचे व्यक्तिगत जीवन शुष्कच राहते. ३५ वर्षानंतर तो पुन: कुंजवनात येतो. त्यावेळी रणमस्तखानाच्या सहवासात त्याचे हे रिक्त मन त्या पुष्करिणीभोवती हरवलेल्या प्रेमाचा अनुभव घेण्या-करिता टाहो फोडू लागते. जीवनातील शेवटच्या पायरीवर उभा राहून तो आपल्या गतजीवनाकडे वळून पाहतो व आत्मशोधन करण्याचा प्रयत्न करतो. ३५ वर्षांपूर्वी कुंजवनात जे सुख उपभोगिले तेच खरे सुख होते असे त्यास वाटू लागते. महत्त्वाकांक्षेने ज्याच्या मागे लागलो ते सुख नव्हे असे त्याच्या मनाला यावेळी पटले.

" सीता सती दे यज्ञि निजबळी ।
उजळुनि ये सोन्याची पुतळी ।। "
किंवा
" मरणात खरोखर जग जगते ।
आधी मरण मग अमरपण ते ।।" –भा.रा.तांबे.

खरे प्रेम असे ताऊन आले की ते योग्य ठरते.

काही माणसे सर्व गोष्टी एकाच मापाने मोजतात. पण साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे माणसाचे मोजमाप १२ इंचाच्या फूटपट्टीने कधीच मोजता येत नाही हेच खरे आहे. तसेच भावनाहि मोजता येत नाहीत. सत्ता व प्रेम यांना रामराजा तराजूत घालतो आणि त्यामुळेच रामराजा चुकतो. सत्ता व प्रेम या दोन्ही गोष्टी एकत्र नांदणे अशक्य. सत्ता मिळविण्यासाठी तो मेहेरजानचे प्रेम झुगारतो. सत्ता मिळविण्याचा मार्ग हा कूट आहे. एक क्षणाची तडजोड ही अनेक काळची वेदना ठरेल, हे रामराजा जाणत नाही. सत्ता हाती येणे ही क्षणाची तडजोड होती. पण त्यासाठी त्याला जीवनाची शोकांतिका पत्करावी लागली. प्रेम फक्त भावनाच जाणते ते पैसा, मानमरातब काही जाणत नाही. राष्ट्रीय डावपेच प्रेमाच्या बाबतीत कधीच यशस्वी ठरत नाहीत. स्त्री ही विश्वासावर जगत असते आणि तो विश्वासच रामराजा गमावतो.

रामराजा पराभव जाणत नाही. मेहेरजानला आपल्या सुखदु:खात सामील होणारा माणूस हवा असतो पण तो तिला मिळत नाही कारण ती जरी प्रेमाची भुकेली असली आणि रामराजाहि प्रेमाचा भुकेला होता, पण त्याचे प्रेम हे एकांगी होते असेच म्हणावे लागेल. कारण प्रेम आणि सत्ता या दोन रामराजाच्या प्रबल इच्छा आहेत आणि त्या इच्छं-पैकी सत्तेपुढे त्याला प्रेमाचे मोल कळत नाही. सत्तेच्या प्रबळ इच्छेने प्रेरित होऊन त्यापुढे रामराजाला मान तुकवावी लागली. पण जी वंचना, जी निराशा मेहेरजानच्या पदरी येते तेच पुढे रामराजाच्या उत्तर आयुष्यात येते. म्हणजेच एका अर्थी त्याच्या जिवनात तो पराभवच मानावा लागेल. शिरीष पै म्हणतात-



Scanned with CamScanner

"अशीहि एक लढाई असते की जिचा शेवट असतो अटळ पराभवात!" रामराजाच्या आयुष्यात प्रेम आणि सत्ता अशी दुतर्फा लढाई होती आणि या लढाईत सत्तेचा विजय होऊन प्रथम प्रेमाचा पराभव होतो. पण नंतर प्रेमच विजयी होते. माणूस जगतो ते भावनेवर. माणसाच्या आयुष्यातून भावना काढली तर तो माणूसच उरत नाही. ही भावनेची रीति पोकळी रामराजाच्या उत्तर आयुष्यात निर्माण होते मायेचा हात फिरवा अशी इच्छा असते पण ते एकदा गमावल्या-वर पुन्हा कसे शक्य होणार ?

" कसे निभाऊन गेलो कळत नाही, बाकी काही नव्हते हाती फक्त हात होते "— अनिल

इथे मानवी जीवनाचे सत्य अनिल सांगतात. रामराजा हेच सत्य गमावतो. त्याच्या उत्तर आयुष्यात ताण कधीच कमी होत नाही. प्रेमाची फलश्रुति होण्या-साठी गगनातून, घरट्यातून घिरट्या घालाव्या लागतात, तरच ते हाती लागते, गवसते.

" सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबनी घ्यावे
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे ।।"

असे प्रत्येकाला वाटत असते. मन ही अशी चीज आहे, की तेथे गुंतावे तेथेच गुंतते. रामराजाचे मन मेहेरजानमध्ये गुंतते. मग तेच मन दुसऱ्यावर असेल तर त्याचे मन तृप्त होणार नाही. सामान्य माणसे थोडक्यात तृप्ती मानतात. असामान्यांचे मग गगन भरारी मारत असते. गगन भरारी मारण्यातच त्यांचे मन अधिक गुंतते. मन इतर गोष्टींकडे त्यांचे लक्ष कसे पोहचणार? मेहरजान सामान्य, पण तिला प्रेमाची व्याप्तीच कळू शकली नाही. कांही मर्यादेपर्यंत रामराजासहि ती कळत नाही पण ती कळल्यावर तो कबूली व्यक्त करतो. इथे रामराज्याचे माणूसपण दिसते.मेहेरजान तसे करीत नाही. त्यामुळे तिच्यात मानवत्व असूनहि ते जाणवत नाही. रणमस्तखानला ती चौकट प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करते. पण ती हे समजू शकत नाही, की माणूस ठराविक, अखीव चौकटीत बसूच शकत नाही. त्याला जीवनातील विविधता अनुभवावयाची असते. म्हणूनच रणमस्तखान विजापूरचा वकिल म्हणून येतो. काही काळानंतर तो रामराजाचा सेनापती बनतो. म्हणजेच ती ज्याच्यापासून रणमस्तखानाला दूर करु पहाते तेथेच तो परत जातो. इथे तिचा पराभव झाल्याचे दिसून येते.

रामराजाच्या बडबडीत आंतरिक भाव असावा असे वाटते. मागच्या कालखंडातील चुकीची दुरूस्ती करण्याचा प्रयत्न तो यातून करतो. पण काही चुका या कधीच दुरूस्त होणाऱ्या नसतात चुकीचे परिमार्जन करतांना हरिभाऊंना माणूस शोधावयाचा होता. तो माणूस चूका करणारा, विशिष्ट क्षणी भावनांच्या आधीन होणारा, चुकीची दुरुस्ती करण्याचा प्रयत्न करणारा ती दुरुस्ती झाली नाही म्हणून प्रश्चाताप करणारा असा माणूस हरिभाऊंना रामराजाच्यारूपाने गवसतो. सत्तेच्या बेधुंद अशा अवस्थेत आपण मेहेर-जानला टाकले, आपण एक अनमोल रत्न हरविण्याची चूक केली हे त्याला कळून येते, त्यापायी पश्चातापदग्ध अशा अवस्थेत तो वावरतो.

माणसाचे जीवन हे मुलभूत इच्छांनी बनलेले असते. या अथांग जीवन सागरात माणूस आपल्या इच्छेने, प्रेरणेने वागत असतो. त्याच्यावर बाह्य नियं-त्रण घालता येत नाही. रामराजा स्वतःच्या प्रेरणेने वागत गेला. पण त्याच्या वागण्याचा अर्थ इतर माणसे वेगळा लावतात. मेहेरजान आपण मुसलमान म्हणून रामराजाने आपल्याला टाकले असा अर्थ लावते. पण रामराजाच्या जीवनात जातीला वावच नाही. तसा वाव असता तर रणमस्तखानहि वास्तविक मुसलमानच. पण त्याच्यासाठी त्याने कितिक प्रयत्न केले आहेत. हिंदु व मुस्लिम या धर्म पायावर मेहेरजान रणमस्तखानाच्या मनात व्देषाचे जाळे पसरवते पण रामराजा ते सारे ढासळवतो. रामराजा वंचना करणारा, लबाड आहे. असा अर्थ रणमस्तखानाच्या मनात पेरते, पण तो संकुचित आहे.

नूरजहान बोलते ते सहजतेने– "आज इतकं वय झालं तरी पुन: तेच दुष्ट कृत्य करण्यासाठी तो कामांध इथे आला" असे ती म्हणते. रामराजाबद्दल तिला



Scanned with CamScanner

काहीच माहिती नसते. रामराजाच्या जीवनातील भिन्न पदर तिला माहित नसतात. माणूस प्रेमाने वेडा बनतो, हे रामराजाच्या बाबतीत खरे आहे सर्वत्र त्याला मेहेरजानच दिसते. नूरजहानहि त्याला मेहेरजानसारखी वाटते. त्याच्या कृतीचा मेहेर-जान अर्थ लावतो तो चुकीचा आहे. ती ते रणमस्त-खानला सांगते. रणमस्तखान उसळत्या रक्ताचा. गव-ताची गंजी व ठिणगी कधीच एकत्र ठेऊ नये. आधीच त्याच्या मनात रामराजाबद्दल द्वेष. त्यात आणखीं भरीला भर. मग काय विचारता. लगेच रामराजाचा शिरच्छेद करण्याची तो प्रतिज्ञा करतो. नूरजहानचा बुरखा काढण्याच्या वेळचा रामराजा हा कर्तव्यदक्ष आहे. कर्तव्यदक्ष राजाचे नैतिक कर्तव्य होते ते करतो केवळ मुसलमान स्त्रीं म्हणून तो तिला बुरखा काढा-यला लावत नाही, तर ते राज्याच्या दृष्टीने हितावह होते म्हणून तो ते करतो.

रणमस्तखान नूरजहानच्या प्रेमात पडतो, हीं रामराजाच्या जीवनातील दुर्दैवी घटना होय. त्याने तिच्यावर प्रेम करणे व अट घालणे हे नियतीचे अटळ नाटयच म्हणावे लागेल. अखेर रणमस्तखान प्रेमाने आंधळा होऊन रामराजाचा शिरच्छेद करतो आणि ते नूरजहानसमोर आणतो. तेथेच मेहेरजान असते. ती अत्यंत उद्वेगाने म्हणते— " पोरा, पोरा ! अरे हा तर तुझा बाप ! पण आता काय उपयोग ? आता एवढाच उपयोग !- - - - - -" असे म्हणून ती ते शीर घेऊन पुष्करिणीत उडी टाकते. या एकाच वाक्यामागे ध्वनी-संगींत आहे. त्यामागे तडफड, करुणा, आर्तता, असहा-यता आहे रामराजाची शोकांतिका ही त्याच्यापुरतीच मर्यादित नाही. तर त्याच्यावर प्रेम करणारी पण त्याने सोडून देताच द्वेषाने जळफळणारी व त्याचा सूड घेण्यास प्रवृत्त करणारी मेहेरजानची पण आहे. वास्तविक पहाता रणमस्तखानला रामराजा हा आपला बाप आहे हे माहित नसते व त्याला तो आपला मुलगा आहे हे माहित नसते. केवळ द्वेष भावनेने मुलाकडून बापाचा शिरच्छेद होतो केवढा हा दैवदुर्विलास ! दैवाचे फेरे कधी कसे पद्धतील हे सांगता येत नाही. रणमस्तखानाच्या ठिकाणी विद्वेषाचे सुरुंग पेरतांना त्यात रामराजाची आहुती पडू नये याची मेहेरजान दक्षता घेत होती. म्हणजेच या विद्वेषातहि तिचे त्याच्यावर प्रेम होते. रामराजा गेल्यावर जीवनात राहिले काय? हा तिच्या-पुढे प्रश्न उभा राहतो. रितेपणाची जाणीव तिला त्याक्षणी होते. हा रितेपणा तिच्या अंतापर्यंत राहणार होता आणि तो तिला असहाय्य झाला असता म्हणून ती पुष्करिणींत उडी घेते शोकनाटयाचा नायक हा उमदा, सहानुभूती वाटणारा असा असावा लागतो. रामराजाच्या उत्तर आयुष्यात तसे वाटते. पापाचे रुपांतर सुन्दर पुष्पात होते. याचे उदा म्हणजे राम-राजा. शोकनाटयात करुणभाव तर निर्माण व्हायला पाहिजे, पण त्याचा जन्म सहजतया हवा. रामराजाची करुणा सहजतया आहे.

रामराजा हा माणूस म्हणून विलोभनीय वाटतो. राजा नियंत्रित असतो, पण राज्यातील माणूस हा अनियंत्रित असतो. रामराजाच्या वागण्यांत विविध कंगोरे असतात. सम्राट बनल्यावर तो नियंत्रित होतो. हे नियंत्रण दीर्घकाळ टिकत नाही. त्याचे नियंत्रित रुप आपल्याला दरबारात नूरजहानचा गोषा दूर करायला लावणे यात दिसते. हे नियंत्रण झुगारण्याचा प्रयत्न तो उत्तर आयुष्यात करतो. या झुगारण्यात सौंदर्य आहे. माणसाचे सौंदर्य बाह्यशक्तीत नियंत्रित होण्यात नसते. मुक्तपणाचे स्वातंत्र्य उपभोगण्याचा ध्यास हा खरा ध्यास. हा रामराजात आहे. बाह्यशक्तीला शरण जातांना तो त्यातच रममाण होतो असे नाही. प्रेमाची व्याप्ती वाढत जाते तसतसे त्याचे रुपांतर बुद्धात, ख्रिस्तात होते. हे धागे जर जुळले असते तर विजापूर व विजयनगर हे एक झाले असते. विस्कळीत पणातील सुसंगती जाणवू लागली असती. रामराजा चुकला असेल, पण काळोखाच्या सोनेरी कडाकडे धावण्यातहि सौंदर्य असते.

महत्वकांक्षेपायी प्रेमाला लाथाडण्यात व ते मुकल्यानंतर त्याच्या आभासावर जगणारा, रणमस्तखान मुसलमान असूनहि त्याच्यावर पितृतुल्य प्रेम करणारा, त्याच्यावर विश्वास टाकणारा रामराजा हे त्याचे व्यक्तित्व साकार करतांना हरिभाऊ स्वकल्पनेचा आश्रय घेतात. रामराजाचे व्यक्तित्व साकार करतांना हरिभाऊ



Scanned with CamScanner

त्यास मानव म्हणून समजण्याचा प्रयत्न करतात.त्यामुळे प्रत्येक घटनाप्रसंगी तो निरनिराळ्या प्रकारे वागतो, चुका करतो, त्या कबुल करतो व वयोमानानुसार त्याचे स्वभावधर्म बदलतात.

चौघांच्या जीवनाची शोककथा व विजयनगरचा विनाश यांची गुंफण हरिभाऊ यात करतात. ज्या कुंजवनात रामराजा मेहेरजानबरोबर प्रीतीसौख्य अनुभवतो व तेथे तिचा त्याग करतो ते स्थळ विजापूरच्या बादशहाच्या ताब्यात जाऊन नाशास प्रवृत्त होते. रणमस्तखान विजापूरचा वकील म्हणून रामराजाच्या दरबारी जातो आणि रामराजा पुत्रा—विषयी वाटणाऱ्या अतीव मायेने आपल्या पदरी ठेऊन घेतो. त्यामुळे बादशहा खवळून त्याच्यावर स्वारी करतो. आणि आपल्या पदरी ठेवलेलाच तो पुत्र फितुरी करुन त्याचा शिरच्छेद करतो. ! एवढी कथा पण ती किती चटकदारपणे हरिभाऊ रेखाटतात. यात रामराजाची विविध रुपे पहावयास मिळतात. मेहेरजानचे संकट निवारण करणारा रामराजा ! रंगेल, रसिक रामराजा ! अपघाती मृत्यूला घाबरणारा रामराजा ! गुप्त कारस्थाने करुन निरुमल्लराय व मणिमल्ल यांना सत्तेवरुन दूर करणारा व अलिअदिलशहाला विजय-गगरातून पळवून लावणारा मुत्सद्दी रामराजा ! पुत्रप्रेमाने आंधळा झालेला रामराजा ! मेहेरजानच्या आठवणीने पुनः विव्हळ होणारा रामराजा ! रणमस्तखान शिरच्छेद करीत असता " अरे, तू तर माझा - - - -" असे त्याला सांगण्याचा प्रयत्न करणारा रामराजा ! असे त्याचे विविध पैलू प्रगट होतात. त्याचे व्यक्तिमत्व अनेकांगी, बदलणारे, भिन्न प्रेरणांच्या दाबाने घडवलेले आहे वाचकाला आश्चर्याचे धक्के देणारे आहे.

रामराजा हा या कांदंबरीचा नायक. तोच मुळी काव्यात्मक प्रवृत्तीचा, काव्यात्मक प्रकृतीच्या मनुष्याला तरह, विशुद्ध व उत्कट अशा जीवनातल्या गोष्टींचा ध्यास असतो हा ध्यास " पूर्णापासून ढळलेले जग आते पूर्णाकडे" असाच असतो. हा ध्यास व हव्या असणाऱ्या गोष्टी यांची सांगड घालणे कठिण असते. यांची सांगड घालण्याचा प्रयत्न रामराजाने केला व त्यात त्याला अपयश आले. every saint has his own past. चुकावर मात करूनच त्याचे रुपांतर संतत्वात होते. रामराजा दिप्तीमान, प्रकाशमान आहे. सामान्य चुकाने माणसाचे मोजमाप करावयाचे नसते. गुणावर प्रेम करणे सहजशक्य पण माणसावर प्रेम करावयाचे असेल तर त्याच्या गुणदोषासकट करावे लागते. मग याला रामराजाहि अपवाद नाही रामराजाचे व्यक्तिमत्व बहु पेडी आहे असा नायक कोणाला आवडणार नाही?

'उष:काल' ही हरिभाऊंच्या प्रथितमश मालेतील पहिली ऐतिहासिक कादंबरी तर 'वज्राघात' ही शेव-टची. हरिभाऊंच्या अन्य ऐतिहासिक कादंबऱ्यापेक्षा आशय, विषय व अभिव्यक्ती या सर्वच दृष्टींनी ती आगळी आहे. 'उष काल' मध्ये कथानकाची उभारणी कोणत्याहि एका व्यक्तीभोवती केलेली नाही, तर तीत निरनिराळ्या उपकथानकांची सांगड चपखलपणे घातली आहे. पण 'वज्राघात' मध्ये सर्व कथानकाची सूत्रे 'रामराजा' या व्यक्तिभोवती फिरत असतात. राम—राजा ही ऐतिहासिक व्यक्ती असली, तरी कादंबरीत इतिहास, राजकारण, सामाजिक किंवा कौटुंबिक जीवनदर्शन अल्पप्रमाणात आहे. पार्श्वभूमी म्हणून या सर्वांचा उपयोग होतो. सबंध कादंबरीत एकच एक सूत्र आहे. एकच कथावस्तू आहे. एकच विषय, एकच जीवनानुभव आहे. रामराजा या अहंकारी, राजकारण-पटू, शूरवीर, महत्त्वाकांक्षी राजाच्या विफल प्रेमाची ही करूणा गाथा आहे.

❋ ❋

# तुम्हाला माहित आहे काय ?

| | |
|---|---|
| १) सर्वात मोठा राजवाडा– | व्हॅटिकन ( रोम ) |
| २) सर्वात मोठे जहाज– | क्विन एलीझावेथ ( ८५ हजार टन ) |
| ३) सर्वात मोठा हिरा– | दि कुलिनन ( ३१०६ १/२ कॅरेटस ) |
| ४) सर्वात उंच पुतळा– | स्वातंत्र्य देवेतेचा पुतळा ( न्युयॉर्क ) |
| ५) सर्वात उंच चर्च– | अमेकथेड्रल ( जर्मन ) (५२९ इंच) |
| ६) सर्वात रुंद व खोल महासागर– | पॅसिपीक |
| ७) सर्वात मोठा चर्च– | सेंट पीटर ( रोम ) |
| ८) सर्वात मोठी दुर्बीण | पॅलॉमनी ( कॅलीफोर्निया ) |
| ९) सर्वात मोठे चित्रपटगृह– | रॉक्सी ( न्युयॉर्क ) |
| १०) सर्वात मोठे उद्यान– | यलोस्टोन नॅसनल पार्क (अमेरिका) |
| ११) सर्वात मोठे द्वीपकल्प– | भारत |
| १२) सर्वात थंड स्थान | व्हर्बीयान्स्क (रशिया) |
| १३) सर्वात वेगवान गृह– | मर्क्युरी प्लॅनेट |
| १४) सर्वात उष्ण स्थान | जाकोबाबाद ( पाकिस्तान ) |
| १५) सर्वात मोठा आलिशान वाडा– | माद्रिदचा वाडा |
| १६) सर्वात मोठा झरा | लेक सुपीरीअर |
| १७) सर्वात मोठे वस्तुसंग्रहालय– | ब्रिटीश म्युझीयम (लंडन) |
| १८) सर्वात मोठे झाड– | जायन्ट सिक्वॉइआ ट्री (कॅलीफोर्निया) |
| १९) सर्वात मोठी घंटा– | मास्को येथील घंटा |
| २०) सर्वात मोठी पर्वताची मालिका– | दी अॅन्डस् |
| २१) सर्वात सुंदर बंदर– | सिडनी |
| २२) समुद्रसपाटीपासून सर्वात उंच शहर– | पास्को (पेरू) |
| २३) सर्वात मोठा मोती– | बेरेस्फोर्ड होम (१८२० ग्रॅम्स) |

एस्. के. कुराडे
प्रथम वर्ष वाणिज्य

Scanned with CamScanner

दिवाकर कृष्ण यांची कथा

# अंगणातला पोपट

कु. पुष्पलता व. मडलगी
बी. कॉम. भाग-१

दिवाकर कृष्णांच्या "समाधि आणि इतर गोष्टी" हा कथासंग्रह १९२७ साली प्रसिद्ध झाला आणि मराठी गोष्टीचे मराठी लघुकथेत रूपांतर झाले. जी मूलतः ऐकण्यासाठी होती, आता ती वाचल्या वाचून तिच्यातील रस पूर्णपणे आस्वादिता येईना. जी केवळ 'श्रवणीय' होती, ती आता 'वाचणीय' होऊ लागली. हरिभाऊ आपट्यानी तिला 'वाचणीय' बनवण्याचा प्रयत्न केला. परंतु १९२९ पर्यंत तिचे स्वरूप हे मूलतः गोष्टीचे होते मग ही गोष्ट रंजक असेल, गमतीची असेल, बोधक व बोधामृत पाजण्याची असेल, पण ती मुख्यतः 'गोष्ट' होती. परंतु दिवाकर कृष्णांच्या कथानी तिच्यामध्ये रूपांतर घडवून आणले.

दिवाकर कृष्णांनी मराठी कथेची गोष्टीपासून बरीच मुक्तता केली. ती कथेत 'गोष्ट' सांगण्यासाठीच जन्माला आलेली नसून, तिचे कार्य ह्यापेक्षा फार मोठे आहे. तिच्या ठिकाणी जीवन-दर्शनाचे केवढे तरी अप्रकट असे सामर्थ्य आहे, हे त्यांनी आपल्या कथांनी प्रथमच मराठी वाचकांच्या निदर्शनास आणले असे वा. ल. कुलकर्णी म्हणतात ते खरेच आहे.

हरिभाऊ आपट्यांची कथा ही पाल्हाळीक होती. मध्यम वर्गीय समाजाचे सूक्ष्म व सहानुभूतीपूर्वक निरीक्षण आणि समाजहिताबद्दलचा जातिवंत जिव्हाळा या गोष्टीमुळे हरिभाऊंची स्फुट गोष्ट रंजक झालेली आहे. पण जीवनांतील चमत्कृतीचे दर्शन म्हणजे पर्यायाने ज्या मनांच्या संदर्भात ह्या चमत्कृतीचे दर्शन आपणास घडते त्या मनांचे दर्शन. आणि ह्याचीच कथेच्या क्षेत्रातील पहिली अस्फुट जाणीव दिवाकर कृष्णांच्या कथामधून व्यक्त झाली. त्यांच्या कथात मनोदर्शनाला महत्व आले ते यामुळेच. एक किंवा दोन मने व त्यांच्या संदर्भात घडलेले एखाद्या जीवनानुभवाचे चमत्कृतीपूर्ण व अर्थपूर्ण दर्शन हा त्यांच्या कथेचा प्रेरक हेतू बनला.

दिवाकर कृष्णांच्या कथेत भाव-भावनांची नाजूक वलये आहेत. जीवनांतल्या करूण गीतांची आर्तता त्यांच्या कथेत आहे. हाताच्या बोटावर मोजता येणाऱ्या सुंदर गोष्टी लिहून दिवाकर कृष्ण हे सुप्रसिद्ध लघुकथाकार झाले. दिवाकर कृष्ण हे जातीचेच एक मोठे कलावंत आहेत. अंगणातला पोपट, दंडकारण्यातील

Scanned with CamScanner

प्रणयिनी, मृणालिनीचे लावण्य, संकष्ट चतुर्थी इत्यादि दिवाकरांच्या लघुकथा वाचताना टागोरांच्या कथांची आठवण आल्यावाचून रहात नाही.

दिवाकर कृष्णांनी कथेकडे कृतिपूर्ण अथवा उत्कंठावर्धक घटना या नात्याने न पाहता, सामान्य माणसाचे त्याच्या जीवनातल्या साध्या-सुध्या सुख-दु:खाचे चित्रण या दृष्टीने पहावयास सुरवात केली. ' होम कमिंग ' व अंगणातला पोपट यांची तुलना या दृष्टीने उपयुक्त आहे. रविंद्रासारखे भावदर्शन हाच दिवाकर कृष्णांच्या लघुकथेचा प्राण आहे. कथेतल्या माणसाचे हृदय हळूवारपणे व्यक्त करण्यात बाल-मनाच्या, स्त्रीमनाच्या आणि उपेक्षित मनांच्या ज्या सूक्ष्म पण उत्कट अविष्काराकडे कथानकप्रधान गोष्टी-लिहिणारे ढुंकूनही पहात नसत, त्यांच्या छटा कुशलतेने चित्रित करण्यात त्यांच्या कथांचे खरे-खुरे सामर्थ्य प्रगट झाले आहे.

" मृणालिनीचे लावण्य " ' समाधी आणि सहा गोष्टी ) या कथेत, ' मृणालिनीच्या लावण्यामुळे घडून आलेला अनर्थ, तिला प्रिय असलेल्या अशोकाच्या वाटयाला आलेला सत्यानाश ' हा या कथेचा मध्यबिंदू आहे. कथानकप्रधान गोष्टींसारखं यात नाटकी कारुण्य नाही आपल्या सौंदर्याच्या पायी निष्पाप, निरागस अशा अशोकाच्या वाटयाला विराण जीवन आले या जाणीवेने आत्मकथा सांगण्यासाठीच दिवाकरांनी मृणा-लिनी निर्माण केली. या कथेत मृणालिनी व अशोक या दोघांचे चित्रण दिवाकरांनी किती कुशलतेने चितारले आहे, हे पाहण्याजोगे आहे. कवि मनाने कथेकडे पाह-णाऱ्या लेखकांची रंगत किती निराळ्या प्रकारची असते, त्याची शैली कशी लयदार होते, एका भावनेच्या सूत्रात सर्व कथांप्रसंग गुंफले गेल्यामुळे किती एकरुप होतात, सूक्ष्म अशा सुख-दु:खाचे किती सजीव असे चित्र आपल्यापुढे उभे करतो आणि त्याच्या कलेच्या नुसत्या अगुंली स्पर्शाने वाचकाच्या हृदयातील भावना कशी दिपज्योतीप्रमाणे प्रफुल्लींत होते. याची आपणाला पुरेपूर कल्पना येते.

" दंडकारण्यातील प्रणयिनी " ही दिवाकरांची अशीच एक अविस्मरणीय कथा आहे. नाजूक प्रणयभाव-नांचा खेळ, रमणीय व अर्थपूर्ण संवाद, रम्य आणि भीषण पार्श्वभूमीचा चातुर्याने केलेला उपयोग इत्यादि अनेक गोष्टीचा या कथेतला संगम हा या लघुकथेच्या विका-साचा एक महत्वाचा टप्पा आहे. या कथेतली वातावरण निर्मीती खुपच सुंदर झालेली आहे. दिवाकर कृष्णांनी फार थोडयाच कथा लिहिल्या याबद्दल मनाला चुटपुट लागुन रहावी इतकी ही कथा सुंदर आहे.

" संकष्ट चतुर्थी " ही सुद्धा त्यांची एक उत्तम प्रकारची लघुकथा आहे. या कथेत मध्यम वर्गीय माणसाच्या संसाराचे चित्रण आहे. यातील सासूचे वागणे, ती करीत असलेला सुनेचा छळ व त्यामुळे उध्वस्थ झालेले सुनेचे जीवन, समस्या सामाजिकच पण त्याचे चित्रण दिवाकरांनी वैयक्तीक दृष्टीकोनातून केलेले आहे. शांतेविषयी सहानुभूती निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी या कथेद्वारे केला आहे. वि.स. खांडेकर म्हणतात- की कथानकांच्या चमत्कृतीपूर्ण गुंफणीपेक्षा हळुवार हाताने केलेल्या चिरंतन भावनांच्या अविष्कारांनी लघुकथेमध्ये सखोलपणा व सामर्थ्य येते, हे दिवाकरांनी दाखवून दिले. कथा-नकाला आधारभूत असलेली एकच-एक भावना तिचा नाजूकपणाने व कुशलतेने केलेला विकास, त्या विकासाला आवश्यक असलेल्या मोजक्या पात्रांचा व प्रसंगांचा कथेत केलेला समावेश इत्यादी नव्या लघुकथेची अनेक प्रमुख अंगे त्यांच्या लेखनातूनच वाचकापुढे आली. त्यांच्या जीवनाविषयक दृष्टीत हळुवारपणाच्या मानाने कणखर-पणा फार कमी आहे, त्यांच्या कथातले कारुण्य केवळ व्यक्तिगत आहे, त्याला सामाजिक पार्श्वभूमी नाही, त्यांच्या कथा वाचून सारे जग काव्यात्मक जीवानी भरले आहे, असा भास होतो, इत्यादी आक्षेप त्यांच्या लेखनावर केले गेले आहेत. परंतू या साऱ्या त्यांच्या प्रतिभेच्या व प्रकृतिधर्मांच्या मर्यादा आहेत.

दिवाकरांच्या कथेची सुरवात लक्षवेधी असते. उदा:- " पोपट आत जाऊ नको बरं भाई रागावतील!" या वाक्याने " अंगणातला पोपट "- या दिवाकरांच्या कथेची सुरवात होते व कथेचा शेवट ही मनाला



Scanned with CamScanner

चुटपुट लावून जाणारी असते. " म्युनिसिपल शाळेतील मुलांनी फाटका समोर उभे राहून हाक दिली 'पोपट' ! " या कथेतील प्रारंभींचे वाक्यच कथेचा उभांकेंद्र आहे. त्याची आई प्रसूति-कालामध्ये त्याला सोडून गेली. जाताना तिने नर्मदेला पोपटला सांभाळण्यास सांगितले. पोपटने आपल्या जात्या मातेचे शेवटचे दर्शन घेतले. आईला चौघानी उचलून दवाखान्यात नेले अशीच पोपटची समजूत होती. तो सारखा नर्मदेला विचारी "आई केव्हां ग दवाखान्यातून परत येणार ?" बिचाऱ्या नर्मदेला रडू कोसळे! या वाक्यातूनच नर्मदेची अगतिकता, पोपटाची असहाय्यता,आईच्या भेटीस आसुसलेला पोपट, याचे चित्रण दिवाकरानी अतिशय रम्यतेने चितारले आहे. ही कथा वाचताना वाचकाचे देहभान हरपून होते व तो त्या कथेशी एकरूप होऊन जातो. आईविना पोरक्या पोराला नर्मदामावशीच सांभाळते. नर्मदा ही पण एक विधवा अभागी स्त्री आहे. "माय मरो पण मावशी जगो" ही म्हण तिने तंतोतंत पाळलेली आहे. एकदा नर्मदेने पोपटला पाडव्या दिवशी नवी पाटी आणली. पोपटला नव्या वर्षाचा नवा आनंद झाला होता. तो भाईना ती पाटी दाखवण्यास ऑफिसात गेला परंतू भाई नाहीत असे कारकुनाने सांगितले. भाई कांही कामानिमित्त्य परगांवी गेले होते. रात्री झोपताना त्याने मावशीला भाई उशिरानं आले तरी उठवायला सांगितले पण भाई त्या रात्री आले नाहीत एकदम तिसऱ्या दिवशी सकाळी आले व ते तडक ऑफिसात जाऊन बरोबर आलेल्या माणसाशी दोन तास खलबत करत बसले. एका बडया रकमेचे प्रकरण त्यांच्या अंगावरती आलेने अगदीच अस्वस्थ झाले होते. त्याना या धांदलीत पोपटची आठवण राहिली नाही. पोपटला राग आला व आपणहून त्यांच्याशी बोलायचे नाही असे त्याने ठरविले, एका रात्री त्याला ताप आला व तो ताप खूपच विकोपास गेला. त्याने एकदा खिडकीतून पाहिले तर त्याचा मित्र ' बन्सी ' इतर मुलाबरोबर शाळेला जात होता. त्याने खिडकीतून हाक मारली पण त्याला ती ऐकू गेली नाही. पोपटला वाटेल सगळे लोक आपल्यावर रागावले आहेत व तो तापातच बडबडू लागला. या जगाचे शेवटचे दर्शन घेतेवेळीं, एकेक क्षण मोजीत मृत्युंच्या हमरस्त्यावर पडलेला असतानाही शेठ नानूभाईना आपल्या पोराचे, स्वतःच्या अकुंराचे, बीजाचे शेवटचे दर्शनही घेता आले नाही.

दिवाकर कृष्णांना या कथेद्वारे या जीवनातील एक भावसत्य अविष्कृत करावयाचे नाही तर त्यातील नानापदर-नानास्तर याना एकत्र आणून त्यातून जीवनाचे अपूर्वत्व कथित करावयाचे आहे. लेखकाला या कथेद्वारे संसार म्हणजे काय व त्याची जबाबदारी कोणती व ती कशी पार पाडली पाहिजे इत्यादि प्रश्नांची उत्तरे शोधावयाची आहेत. मोठा बंगला बांधणे, दारात गाडी असणे आणि धंद्यातील एक निष्णात व्यक्ती म्हणून लोकांचे मुजरे घेणे म्हणजे ही खरा संसार नव्हे. रुपयांच्या नोटांच्या आधारापेक्षा संसार हा प्रेमावर चालतो; ममता, वात्सल्य, त्याग आणि आपुलकी याच्यावर बहरतो, भाईसाहेब भरपूर पैसा कमवीत, हवा तेवढा बायकोला देत, पण तरीही ते खरे आदर्श संसारी नव्हेत. प्रेमाची ओल, मायेचे खत आणि कर्त्याची पाखर असण्याखेरीज संसार वेलीची वाढ होत नाही. दोन वेळा पोटाची खळगी भरण्यास व रात्री अंग टाकण्यापुरते घरचा रस्ता धरणारा माणूस परिपूर्ण नव्हे. ज्याचं मन पैशानं मारलं गेलं आहे जो शाश्वत जीवनास पारखा झालेला आहे, त्याला नोटाच्या गादीवर झोपवले तरी तो कदापिही सुखी होणार नाही. संसार म्हणजे परस्परांच्या व्यक्तित्वाचा विकास करीत असतानाच स्वत: अधिक शुद्ध होत जाऊन समाजाचे लागणारे ऋण अल्पाशांने का होईना प्रामाणिकपणे फेडणे होय.

दिवाकर कृष्णांनी या कथेत एक भावसत्य समुचित प्रसंगातून साकार केले आहे. सुख भोगात नाही, ते त्यागात आहे. सुख संपत्तीत नाही ते संततीत आहे. सुख विलासी जीवनात नाही तर ते विरागी जीवनात आहे. आणि हेच भावसत्य दिवाकरांना या कथेद्वारे व्यक्त करावयाचे आहे.

दिवाकर कृष्णांच्या या कथेत पात्रेही खूप नाहीत. पात्रे ही दोनच, एक नानूभाई व दुसरा पोपट. या दोन पात्राच्या मनांतील संघर्ष दिवाकरांनी या कथेत चित्रीत



Scanned with CamScanner

केलेले आहे. पोपटचे जग स्वच्छंदी तर नानूभाईचे जग हे व्यवहारी पणाचे जग आहे. त्यांच्या या कथेत घटना मोजक्याच आहेत, परंतू त्यात भावनीक संघर्ष आहेत. ज्या घटनेत भावनेची ठिणगी अधिक फुलणारी असेल व ज्या घटनेतील भावना ही संघर्षमय असेल तीच घटना वाचकांचे हृदय हेलावून टाकते. व तीच घटना कथेला लायक ठरते. दिवाकर कृष्ण हे कथेकडे कविच्या काव्यात्मतेने पहातात. काव्याची दृष्टी ही सौंदर्याची दृष्टी असते. व ज्याची दृष्टी निर्मळ, सुंदर असेल त्याला सारी वृष्टी सुंदरच दिसेल.

दिवाकरांच्या कथेतील "प्रतिमा" या फारच सुंदर असतात. या कथेत 'लाकडी हिरवा पोपट' 'रिताळी पिंजऱ्यातील पोपट' या प्रतिमा अतिशय सहज-तेने वापरलेल्या आहेत. व सहजतेतच अधिक सौंदर्य असते. त्यांच्या कथेची रचना ही सहज, बांधेसूद असते. त्यात फाफटपसारा नाही, अनावश्यक भाग नाही, कथेत पाल्हाळ नाही. त्यांची कथा ही वाचकांच्या अनुभवाच्या कक्षा रूंद करते. त्यांच्या कथेत दुःखाच मूर्तीमंत रूप पहावयास मिळते. दिवाकरांच्या कथेत प्रतिकाना फार महत्व 'अंगणातला पोपट' या त्यांच्या कथेतील पोपट हे भावनाशीलतेचे प्रतिक तर नानूभाई हे व्यवहारी-पणाचे प्रतिक आणि ही दोन्ही प्रतिके एकत्र कधीच नांदू शकत नाहीत. व्यवहारीपणाच्या जगात भाव-नाशीलतेची पुष्प पायदळी तुडवली जातात भावना शीलता ही चीज खूप नाजूक आहे, ती अतिशय आत्मीयतेने जपली पाहिजे. तंबोऱ्याच्या तारावर 'हळुवारपणे' संवेदनशीलतेने बोटे फिरवायची असतात. तशीच भावनाशीलता ही हळुवारपणे जोपासवयाची असते.

व्यवहारीपणा हा अतिशय रुक्ष, वैराण वाळवंटा सारखा असतो. नर्मदच्या पात्रांतील झिजलेल्या गोट्या-सारखा व्यवहारीपणा आहे. हा व्यवहारीपणा हिशेबी वृत्तीचा असतो. भावना, हृदय, अंतःकरण दुःख यांची फिकीर त्याला नसते आणि असा हा व्यवहारीपणा सुखाच्या पाठीमागे असतो— व्यवहारीपणाला एकप्रकारच कुंपण असते. व्यवहारी माणसे कुंपणाबाहेर न जाता स्वतःला त्यातच कोंडून घेतात. स्वतःला आणि इत-रानांही कोंडून घेतात. उदा. नानूभाई ह्या कुंपनाबाहेर पडत नाहीत व निरागस, निष्पाप अशा पोपटलाहि या कुंपनाबाहेर जाण्यास सक्त मनाई आहे.

दिवाकर कृष्णांनी या कथेद्वारे एका नाजूक, भावकोमल, आणि हळुवार बालमनांचे हुंदके तितक्याच समरसतेने साकार केले आहेत. त्या बालमनाची तडफड, वेदना, एकलेपण असहाय्यता यातून वाचकाला खोल-खोल नेले जाते. त्या शिशुमनांचा जीवनपट उलगडत असतानाच मानवी जीवनांतील भावसत्याचे दर्शनही येथे घडविले आहे. पुत्र, पिता, पैसा, प्रेम यातील नाती! जीवनात श्रेष्ठ काय? जीवनाचे सुख कशात आहे? बालमनांची भूक कोणती इत्यादी अनेक प्रश्न उभे राहतील अशीच रचना या कथेची आहे. व त्याची उत्तरेही तितक्याच सूचकतेने दिलेली आहेत. चांगली, परिपूर्ण कथा, रचनासौन्दर्या-पेक्षा नवलपूर्ण, अपूर्व अशा भावसत्याच्या साक्षात्कारा-तूनच सौन्दर्य निर्माण करीत असते. चांगली कथा म्हणजे मानवी जीवनाच्या चिंतनातून साकार झालेल्या भाव-क्षणाचे सौंदर्यपूर्ण अविष्करण असते. किंवा आशयघन-तेमुळे जीवनाचे अधिक व्यापक दर्शन घडविणारे शब्द-शिल्प असते. असेच एक सुन्दर शब्दशिल्प म्हणजे

" अंगणातला पोपट "

# मैदानी शर्यत

मोहिते कल्लेश्वर एस्.
बी. ए. भाग २

**धावण्याची शर्यत-**

धावणे, उडया मारणे या नैसर्गिक क्रिया होत. धावण्याची पद्धत जाणून घेणे सर्व प्रकारच्या खेळाडूंना आवश्यक आहे. लांब उडी, उंच उडी, बांबूची उडी (पोल व्हाल्ट), भालाफेक करणाऱ्या खेळाडूंना त्या त्या क्रिया करण्यापूर्वी आधी धावत येण्याची क्रिया अगोदर करावी लागते. बॉस्केट बॉल, हॉकी यासारख्या सांघिक खेळात भाग घेणाऱ्या खेळाडूनाही त्यांच्या खेळांचे सांघिक कौशल्य उत्तम तऱ्हेने दाखविण्यासाठी धावण्याची क्रिया करणे अगदी जरुरीचे आहे.

कला आणि वैशिष्टय यामध्ये कोणत्याही दोन व्यक्ति कधीही सारख्या आढळून येत नाहीत. त्यात नेहमी भिन्नता आढळते. प्रत्येकाच्या शरीराची व स्वभावाची ठेवण वेगळी असते. एकाच पद्धतीने धावणारे अनेक स्पर्धक असूच शकत नाहीत. उदाः- राजा शेटगे (शिवाजी विद्यापीठ) व दर्शनसिंग ( पंजाबी विद्यापीठ) या धावपटूंना १०० मीटर्सचे अंतर तोडण्यास ( अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ग्वालियर ) १०.७ सेंकद लागले. त्यांच्या धावत्या पावलांची लांबी व त्यांचा वेग मात्र भिन्न होता दर्शनसिंग या खेळाडूची १ सेंकदात ४।। धावती पावले पडत तर राजू शेटगे (शिवाजी विद्यापीठ) १ सेंकदात ४ धावती पावले टाकीत असे. तरी ही १०० मीटर्सचे आंतर काटण्यास दोघांना लागणारा वेळ एकच होता. याचे कारण राजू शेटगेच्या धावत्या पावलांची लांबी दर्शनसिंगपेक्षा जास्त होती.

चांगल्या प्रकारे धावण्यासाठी खेळाडूने सर्व प्रकारच्या स्नायूंचे व अवयवयांचे सहकार्य मिळवावयास पाहिजे एखाद्या भागाचे स्नायु कमजोर असतील तर योग्य प्रकारचा व्यायम करून ते स्नायू मजबूत केले पाहिजे. धावण्याच्या क्रियेचे पृथक्करण करण्यासाठी पुढील सहा भागांचा स्वतंत्रपणे अभ्यासणे आवश्यक आहे.

अ) पायाची क्रिया
नं) हाताची क्रिया
दा) शरीराचा कोन
शि.) वायुविरोध
ना) डोक्याची स्थिती
ळे) श्वासोच्छवास

१) **पायाची क्रिया-** कटिबन्धाशी जोडलेल्या तीन तरफामुळे (पायाची व कमरेची हाडे) मनुष्याला विविध प्रकारच्या हालचाली करता येतात. धावण्याचा वेग दोन गोष्टीवर अवलंबून असतो.

ब) धावताना पडणाऱ्या पावलांचा वेग- ज्या खेळाडूंची पावले जलद पडतील त्यांना शर्यतीचे अंतर कापण्यास कमी वेळ लागेल.

Scanned with CamScanner

५) ढांगांची रचना (Lenght stride) ज्या खेळाडूच्या ढांगा लांब व जलद पडतात त्यांनाही सर्वांतीचे अंतर कापण्यास कमी वेळ लागेल (Power proportion between lenght of stride and rate of strible) १०० मीटर्स व २०० मीटर्स या शर्यतीत यशस्वी होण्यासाठी वरील दोन्ही गुणांची सारखीच आवश्यकता असते.

२) हाताची क्रिया–

धावणाऱ्या खेळाडूच्या शरीराचा तोल सांभाळण्याचे कार्य प्रामुख्याने हातांच्या हालचालीवर अवलंबून असते. हाताची क्रिया धावपटूच्या पायाच्या क्रियेविरुद्ध होत असते. म्हणजे डावा हात उजव्या पायाबरोबर पुढे येत असतो व उजवा हात डाव्या पाया बरोबर पुढे येत असतो. खेळाडूला हात थोडे खाली सोडून पळावे की वर उचलून पळावे ही गोष्ट अनुभवानेच समजू शकेल.

१) धावणाऱ्या खेळाडूला जर त्याचे हात एकंदर शरीरापेक्षा लवकर थकत आहेत असे वाटले तर त्याने धावताना हात हालवण्याची पद्धत चुकीची आहे. त्यात योग्य तो बदल करावा.

२) धावणाऱ्या खेळाडूंची हाताची हालचाल नैसर्गिक असावी. त्यात एक प्रकारची तालबद्धता असावी.

३) हाताची हालचाल शक्यतो शरीराच्या जवळून व्हावी.त्यामुळे शरीराची स्थिती सरळ ठेवण्यास सोपे जाते व कार्यशक्ती इतरत्र वाया जाणार नाही.

४) खेळाडूच्या हाताची हालचाल पळण्याच्या दिशेने व्हावी. त्यामुळे धावपटूला पुढील दिशेने जाण्या-करिता एकप्रकारचे सहाय्य होईल.

५) हाताच्या मुठी घट्ट आवळून धावपटूने धावू नये. बोटे ढिली असावीत म्हणजे हाताच्या स्नायूंची हालचाल मोकळेपणाने होईल.

६) अपवादात्मक उदाहरण- अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सामन्यामध्ये ५००० मीटर्स धावण्यासाठी नवीन विक्रम करणारा हुरमीतसिंग (१४ मि. ५८ सेकंद) पंजाबी विद्यापीठ यांच्या हाताची क्रिया मात्र सर्वसाधारण खेळाडूपेक्षा, भिन्न असल्याचे आढळून आले धावताना त्याचे हात व खांदे हे दोन्ही एकदम हालचाल करीत असत खेळाडूने स्वतःला नैसर्गिकरीत्या जमेल असेच हाताची हालचाल करावी.

३) शरीराचा कोन- साधारणपणे ७५ अंशाचा कोन तोल सांभाळण्याच्यादृष्टीने इष्ट आहे. जसजसा धावपटू आपला वेग वाढवू लागतो तसतसा शरीराचा कोन कमी होत जातो. १०० मीटर्स दौड या शर्यतीमध्ये भाग घेणाऱ्या धावपटूचा शरीराचा कोन कमी असतो आणि मॅरेथॉनमध्ये भाग घेणारे खेळाडू जवळजवळ ताठ धावतात.

४) वायुविरोध– धावणाऱ्या खेळाडूला वायूचा सतत विरोध होत असतो. जेव्हा धावणारा खेळाडू अत्युच्च वेगात असतो त्यावेळी समोरून वाऱ्याचा जोराचा झोत येत असेल त्यावेळी वायुविरोधामुळे खेळाडूची कंबर ताट होण्याची प्रवृत्ती वाढते. अशावेळी तोल संभाळण्यासाठी शरीर अधिक पुढे झुकविणे फायद्याचे ठरते. जर पाठीमागून वाऱ्याचा झोत येत असेल तर खेळाडूने शरीराचा कोन वाढवावा. व कंबर ताठ ठेवावी. म्हणजे पुढे धावण्याच्या वेगास मदत होईल.

५) डोक्याची स्थिती– पूर्ण वाढ झालेल्या खेळाडूच्या वजनाच्या ( एक तेराअंश ) जवळ जवळ वजन डोक्याचे असते. डोक्याच्या वजनामुळे व पाठीच्या कण्यावरील असणाऱ्या त्याच्या विशिष्ठ स्थितीमुळे डोक्याच्या कोणत्याही हालचालीचा खेळाडूच्या इतर भागावर परिणाम होतो. म्हणून डोक्याला शरीराचे सुकाणू म्हटले जाते.

खेळाडूचे डोके-खांदे-कंबर एकाच रेषेत असावे. दृष्टी धावण्याच्या दिशेने २५ ते ३० यार्डांवर असावी. अहमदाबाद ( गुजराथ ) येथे १९७२ । ७३ झाली



Scanned with CamScanner

भरलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सामन्यामध्ये गुरुनानक विद्यापीठाचा जर्नैलसिंग याने डोक्याची हालचाल डाव्या खांद्यावरून उजव्या खांद्याकडे–उजव्या खांद्याकडून डाव्या खांद्याकडे करताना आढळून आले. ( Twisting of head form sido to sido ) असे केल्याने मानेवर पडलेला ताण कांही प्रमाणात नाहीसा करण्यास सोपे जाते.

खेळाडूने धावताना डोके मागे टाकून पळू नये. असे केल्याने वेग कमी होतो, शर्यतीच्या शेवटी थकल्यामुळे कांही खेळाडूचे डोके-मान मागे झुकविली जाते. त्यामुळे त्याची कंबर ताठ होते व स्टेप–धावण्याची ढांग लहान होते.

६) श्वासोच्छवास–धावणाऱ्या खेळाडूने श्वासोच्छवास नैसर्गिकरीत्या होवू द्यावी. कांही खेळाडू तोंडात रुमाल घालून पळत असताना आढळून आले. त्यामुळे श्वासोच्छवासाच्या क्रियेत अडथळा निर्माण होतो चांगला श्वासोच्छवास होण्यासाठी कमरे पासूनचे वरचे शरीर ताठ पण ढिले सोडावे.

आपल्या शिवराज महाविद्यालयाचा खेळाडू वामन रजपूत हा खो खो खेळत असताना तोंडात रुमाल धरून पळत असतो हे चुकीचे आहे.

खेळाडू ! खेळाडू !! खेळाडू !!!

शिवराज

* *

## प्रेमासाठी प्रेम द्यावे

धुंद–फुंद आर्णवाचे
मज वाटे गीत गावे
वेड्या–पिस्या लाटामध्ये
ओणाउन मस्त नहावे !

उष:काली तृनावरचे
हलक्याने दव प्यावे
गंध स्वास मारुताचे
ओंजळीत साठवावे !

वाटे मज कधी कधी
वाऱ्यासवे वागडावे
उधळुनी रंग ढंगाचे
चराचर रंगवावे

कधी व्हावे केळफूल
एकदाच जन्मा यावे
गळ्यामध्ये गळा घालून
पाकळ्यानी उमलावे

व्हावे कधी रणपक्षी
पिला अन्न भरवावे
चोचीमध्ये चोच घालून
प्रेमासाठी प्रेम द्यावे

रंगराव पाटील
कडगांव



Scanned with CamScanner

# धनुर्धारी

१) पुरूषानी स्त्रीबरोबर अप्रामाणिक असणं म्हणजे घरातून रस्त्यावर थुंकण्या-सारख आहे आणि स्त्रीन आपल्या पतिबरोबर अप्रामाणिक असणं म्हणजे रस्त्यातून घरात थुंकण्यासारख आहे.

२) लग्न हे शिंके प्रमाण असते त्या विषयी पूर्व सुचना नसते.

३) औषधाची गोळी घेताना व विवाह करताना माणसानी अधिक विचार करावा.

४) लग्नापुर्वी डोळे संपुर्ण उघडे ठेवावेत. लग्नानंतर अर्धवट झाकलेले असावेत.

५) विवाह म्हणजे एक वेढलेला किल्लाच. किल्ल्याबाहेर असणाऱ्याना आत जावसं वाटतं, तर आत असणाऱ्याना बाहेर पडावसं वाटत.

६) बायको ही एकच गोष्ट अशी आहे कीं, केली तर पश्चाताप होतो आणि नाही केली तरी पश्चाताप होतो.

७) गुलाबाच्या झाडांला कोठून किड लागते कळत नाही. पण किड लागताच त्याच्या फांद्या छाटाव्या लागतात. नाही तर झाड मरुन जात. मनाचंहि तसच आहे.

८) आयुष्याच्या खडतर बागेत फुलणारे कर्तव्य हे एक सुंदर फुल आहे.

९) जो माणुस स्वतःच्या निर्धनतेवर असंतुष्ट असतो तो दुःखी नव्हे, तर दुसऱ्याची संपन्नता पाहून जो असंतूष्ट असतो तो दुःखी होय.

१०) गर्विष्ट आणि विनयशिल याना ओळखण्याचे मुख्य गमक हे की गर्विष्ट माणूस आपली स्तुती स्वतः गातो. तर विनयशिल माणसाची स्तुती दुसऱ्याला गावी लागते.

११) सामर्थ्यवान माणसे नेहमी भविष्याची सोनेरी स्वप्ने रंगवितात. तर दुबळी माणसे सतत यातनांची रडकथाच गात रहातात.

संग्राहक
**बी. आर. लांडे**
एफ. वाय. बी. ए.



Scanned with CamScanner

# काटा

लेखक :- पाटील बी. एस.
B. COM, Part III
शिवराज कॉलेज गडहिंग्लज.

सूर्य डोक्यावर तळपत होता. ऊन रणरणत होतं. पांडा घाईघाईनं येत होता. डोक्यावरील गाठोड्याची सावली तोंडावर पसरली होती. लालधूळ पायाना चटकें देत होती. अंगांतून घाम झिरपत होता. घामान डोळयांच्या पापण्या ओलावल्या होत्या. समोरच्या मृगजळांतून गेल्या उन्हाळयातल्या स्मृति डोळयासमोरून वेडया वाकडया धावत होत्या.

'हं ! शनिवारच होता बाजारचा दिवस. असाच रखरखीत उन्हाळा होता. मी नको नको म्हणत असता, लवंगी बाजारला गेली होती. मी बाहेरच्या सोप्यात कलंडलो होतो. ह्याच वाटकडं डोळ लाऊन, लवंगी उन्हाचच धापा टाकीत परत आली. घरात आल्या आल्या उन्हान मिरमिरी येऊन सोप्यात उभ्यानच कोसळली. आपण गडबडीन उठलो पाहीलं, तर लवंगी निपचिप भिंतीला टेकली होती. आपण घाईन तिच्या छातीवर हात टेकला. तिच काळीज धडधडत होतं; आणि माझ सुद्धा. आपण तिला हालिवली बोलिवली तर काय ऽम्हाई--

एकदम खच्चून बोंबच मारावी असं वाटलं. तरी ओरडलोच.

" काकू ऽऽऽ! ये हिकडं ये काकू ! "

काकू धावत आली तशी तिन एका मिनिटांत गल्ली गोळा केली. ' च्यायला मला तवा कायबी कस सूचल नसल ? ' नुसता तिन्हाईतासारका बगतच हुबा होतो. डोळें फाडून बगत होतो. हे सेवटचच पहाण. कायकी म्हणून लवंगीला सगळीच एकादमानं डोळयात साठवायचा प्रयत्न करीत होतो. हाळकुंडा सारखी लवंगी उन्हान तांब्रीलाल दिसत होती. ते सोन्यासारख सोळाकसानं उजाळल्याल रूप बगून मन आक्रोश करीत होत, ' आता काय करू ? ' आया बायानी तिची दातकुळी पेचली. तोंडात पाणी घातल. तांब्याभर अंगावरबी वतंल. बायका मुपान वारं घालीत होत्या तोवर देव्या देवरूपी वाऱ्यासारखा धावत येऊन आंत घुसला. आल्या आल्या त्यान डोळं वटारून अधिकारवाणीन बाया वरनी रव्यास मारली. चार शिव्या हासडल्या तशा घरांतल्या बायका गोगलगाईसारख्या थव्या थंव्यानं रस्त्यावर पांगल्या पाणी मारून ओला झालेला पदर लवंगीच्या छातीवर चिकटला होता. तेवढया माणसात देव्यान बेधडक लवंगीच्या छातीवर हात ठेविला. तसाच कितीतरी वेळ. नंतर तिच्या केळीच्या-कोंबासारख्या पिढऱ्यावरून त्यान आपला हात थेट तिच्या मांडीपर्यंत फिरविला. त्यावेळी त्याच्या दुप्पट वेगानं आपल्या पायातल्या मुंग्या डोक्यात चढल्या. वाटत होत; देव्याच डोसक सापासारख ठेचून काढाव. उन्हाची कळकली कमी होऊन लवंगी हालचाल करणार होती. तोवर देव्यान कायतरी पुटपुटत, लवंगीला सरळ बसवायच्या निमित्तान तिला मिठीच मारली. माझ्या डोसक्यात झेडू चढला मी कळवळून किंचाळलो.

" आर ये ! तिला उन्हान झीट आलीया, नि तूं आणि का लागलाईस उगच, सर तितला "

तोवर काकू धावली, आयाबाया फुड आल्या, लागल्या माजंगालोरं धिऊन कलकलायला

" आरं ये माज्या हांटप्पा ! तरणीताटी पोर उनातन लसलसा आली–या, वडधावरचं वारं झपाटल आसल गुमान कुप्याागत बस " बायकानी मला भाईर ढकलला. जाता जाता माग बगीटल, लवंगीचा बुचडा सुटला होता. पदर ढळला होता. आर्ध्यामुर्ध्या मांडघा उघडघाच होत्या, आणि देव्या––वखरलेल्या नजरन बगीत होता. म्हणत होता " जरा सगळीच भाईर व्हा दार वडून घ्या "

" तू अगोदर चालता हो " मी किंचाळलो तसा देव्या अंगारा लाऊन मागं सरला, थोडघा वेळानं सगळीच पांगापांग झाली.

उन्हान भेंडाळल्याली बायको अंथरून घालून पडली, आणि जणु आपणच या गरीबाच्या बायकोला वांचवली अशा तोऱ्यानं देव्या संध्याकाळी आला, मी च्या ला दूद आनाय गेलो, तेवढघात लवंगीचं अंग मोठ्या मायेन रापू लागल ते बगून मी म्हटलं,–

" देवाप्पा ! बायकू मेलीतर मरूंदे पर तुजी डागदरी फुरं " तवा पासनं त्यान डूक धरलाय. सारखा काकीच्या'हितं येऊन बसतोय,– आन् काकी तर काय तेच्या मारी.........आज पंढरीला जाती म्हणं–– ?

अशा विचार चक्राच्या प्रत्येक दात्यावर पाय ठेवीत पांडा येत होता त्याने समोर पाहील, उन्हामुळे डोळ्याना अंधारी आल्यासारख वाटलं, म्हणून त्यान शर्टाच्या टोकानं घाम पुसला, मग त्यान पुन्हा एकदा पापण्यांची उघडझाप करून पाहिलं बाहेरच्या सोप्यात देव्या देवरूषी बसला होता, लांब तांगडघा पसरून, डावा हात गळ्यांतल्या पेटीशीं चाळा करीत होता, उजव्या हाताची बोट लांब सडक केसातून फिरत होती मलमलच्या शर्टातून पटघाची बॉडी दिसत होती, तसल्याच धोट धोतराचा सोगा खांद्यावर होता.

## हे असंच कुठपर्यंत ?

भरशिल कोठवर गडे !
आपल्या विहिरीवरती घडे ?
पहा ! मी उभा ठाकलो पुढे. ।।धृ।।

तुज अंगणामधली विहीर ती धाकटी,
फुलविशील तिजवर बाग जरी गोमटी,
तुज परिश्रमांची कशी पटावी साक्ष भविष्यापुढे,
तिथे तु भरशिल कुठवर घडे ? ।।१।।

त्या विहीरीतला मुळी जिव्हाळा थिटा,
त्यातुनी तिच्यावर चाळीची मालकी,
अर्थातच तुजसवे ते भांडतील शेवटी,
का उगिच पुस्तक पुढे धरोनी, डोळे रस्त्याकडे,
असोनी मजसम मित्र पुढे ? ।।२।।

हो सज्ज माझी तर आस कराया पुरी,
मग मात्र–तात तुज रागे भरले जरी,
हा पाहा ! मी उभा ठाकलो तुजशेजारी ।।३।।

चंदू मोरे (भडगांवकर)
प्री. डीग्री कॉमर्स.

Scanned with CamScanner

# अर्मी अटॅचमेंट नासिक

अंडर ऑफिसर— पाटील डी. एस्.
एस्.वाय.बी.कॉम.

गाडीची अखेरची शिटी झाली. निरोपाचे हात हालू लागले. ... रुमाल फडफडू लागले. ... त्या रात्री सुद्धा पाणावलेल्या डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रुतील जिव्हाळा प्रेम व ममता चमकत असलेली दिसली. कोणास उत्तुंग आनन्द. . . . कोणास कठोर दु:ख. . . . ती ताटातूट. . . .! स्टेशनवरील सुखदु:ख. . . . . . आनन्द . . . . पाहून मला वि. स. खांडेकरांच्या ' स्टेशन ' या लघुनिबन्धाची आठवण झाली. रात्रीचं दहा वाजलं होतं.

आता गाडीनंही वेग घेतला होता. इतक्या दुरचा शिवाय रेल्वेचा प्रवास मी पहिल्यांदाच करत होतो. माझं प्रवासवेडं मन उत्साही झालं होतं. सभोवार कृष्णपक्षातील घणघोर काळोख पसरला होता. आता गाडी अंधारातून मुसंडी मारत पुढे उसळत होती. त्या भयान काळोखात सगळं निपचित पडलं होतं. दूरवर दिसणारे लूकलुकणारे विजेरी दिवे आकाशगंगेतील गृह-ताऱ्याप्रमाणे चमकताना भासत होते. अंतराळवीर निल आॅर्मस्ट्रांगला देखील अंतराळयानातून प्रवास करताना विश्वातले तारे असेच चमकताना दिसले असतील.' बाहेरच्या भयाण काळोखात नजर लाऊन मी मनाशी गोड कल्पना करत बसलो होतो. (एकांतात मला सभोवारचं वातावरण शब्दात रंगवणं, एखाद्या विषयावर चिंतन, वाद आणि वादंग करण्यांत आनन्द वाटतो.) एकामागून एक स्टेशन जात होती. आणि यांत केंव्हा झोप लागली पत्ताच नाही!

सकाळी थोडं जेजुरीच्या अलीकडेच उठलो. जेजुरीच्या खंडोबाचं दुरुनच दर्शन झालं. सकाळचं कोवळं ऊन सह्याद्रिच्या कुशीतल्या उंच उंच टेकडांवर पसरलं होतं. मुलायम हिरवळीवर साचलेल्या दंवबिंदूवर सुर्यकिरण पडल्यामुळे ते हिऱ्यासारखे वाटत होते. मी अवाक् होऊन पहाताच राहिलो.

नंतर सासवड वगैरे गेल्यानंतर पुण्याच्या झोपड-पट्टीने आमचं भव्य स्वागत केलं. कुत्र्याच्या पिलागत वळवळ करणारी झोपडपट्टीतील मुलं पाहून मला कसं-तरीच झालं.... कुठंतरी सललं.... पण . . . पण. . . गाडी एकादाची पुण्य नगरीत थांबली. मनांस थोडं समाधान वाटलं. कारण थोर साहित्यिक रा.ग.गडकरी, न. चिं. केळकर व अत्रे यांच्या पायधुळीनं पवित्र झालेलं पुणं आज विद्येचं माहेरघर म्हणून ओळखलं

Scanned with CamScanner

आतं! आणि अशा पवित्र व पुण्य नगरीत मी अवतरलो होतो... ... !

येथून पुढेच आमची महालक्ष्मी निसर्गरम्य वातावरणातून धावणार शिवाय महाराष्ट्रातील प्रसिद्ध निसर्गरम्य ठिकाणं येथून पुढेच लागणार या भावनेत मी आनन्दून गेलो. पुण्यात थोडा चहा घेतला. हळूहळू आम्ही मग पुण्याचा निरोप घेतला. गाडीनेही आता वेग घेतला होता. कारण खंडाळयाच्या निसर्गरम्य सुंदर क्षेत्रात विसावण्यासाठी ती ही आतूरलेली आसूसलेली असावी ! आणि थोडयाच वेळांत लोणावळा आला. खंडाळा लोणावळा याचं वर्णन मोठमोठया साहित्य सम्राटांनी प्रसिद्ध कवीनीही केलेलं आहे. तेंव्हा मी आणखी येथे काय लिहीणार? पण मी जे पहात होतो ते दुर्गम दुर्मिळ होतं शिवाय मी हे जीवनात प्रथमच पहात होतो. याखेरीज मी येथे कांही सांगू शकत नाही.

गाडीने लोणावळा सोडला. खंडाळयाच्या उंच उंच शिखराना हळूवार विळखा घालून गुहेत वाघीण शिरावी त्याप्रमाणे बोगद्यात बेधडक घुसणारी महालक्ष्मी पाहिली कीं मलाच थोडी भिती वाटे! एकीकडे उंच पर्वत-दुसरीकडे खोल दरी जेथे डोळयांची नजर पोहचत नाही, पहाताना मन घाबरतं, छाती धडाडते, पण पण त्याला देखील सुन्दर शोभा आणणारी छोटी छोटी कोवळया पानांची नाजूक हिरवीगार टवटवीत झाडे पाहिली की नजर चळते. भयाणतेची भिती मावळते. मन प्रफुलीत होते. या वातावरणानं मी अगदीच बेभान झालो होतो. इतकं की कर्जत केंव्हा आलं पत्ताच नाही.

कर्जतपासून आकाशाला भिडू पहाणारे ताड माड आपली उंची दर्शवू लागतात. जून महिना असल्याने पावसाच्या एकदोन सरी येऊन गेल्या असाव्यात, त्यामुळे सगळीकडे-नव्या नव्हाळीतली हिरवळ चौफेर पसरली होती. कर्जतहून, कल्याण, ठाणे वगैरे छोटया मोठया स्टेशनांना धावती भेट देत देत आमची महालक्ष्मी मुंबईच्या खाडीत घुसली ! मुंबई ! अनेकांच्या जीवाभावाची - - - - अनेक अनाथाना आश्रय देणारी - - - - - - चुकल्या मुकल्याना पदराखाली घेणारी- - - -! कोणतरी म्हणत " भारताच्या काणाकोपऱ्यात कुठंही चुकणारं माणुस केंव्हा ना केंव्हांतरी मुंबईच्या कुशीत आसऱ्यास आल्याशिवाय रहात नाही " अशी ती मुंबई. छोटया मोठया इमारतीत खच्चून माणसं भरलेली दिसत होती माझी मुंबईची पहिलीच भेट होती. मनांत उत्सुकता आणि कुतूहल दाटलं होतं. शेवटी भायखळा, दादर, डोंबीवली स्टेशनावरून गाडी व्हिक्टोरियाच्या भव्य स्टेशनात घुसली एकदाची ! डब्यात गडबड उडाली. सर्व साहित्य बाहेर काढलं. आणि मुंबईच्या भूमिवर माझं पहिले पाऊल मी उमटविले !

जवळ जवळ पंधरा सोळा तासाच्या प्रदीर्घ प्रवासामुळे आमचा एन. सी. सी. ड्रेसमधील अवतार अगदी पहाण्यासारखा झाला होता. आम्ही अडीच वाजता पोहचलो होतो नासिकला भुसावळ गाडी ९ वाजता होती आम्हास तसा खूप वेळ होतां, पण चहा-पाणी जेवणखाणं आटपोपर्यंत साडेचार वाजले खाजगी ड्रेस घालावयास परवानगी नव्हतो. सर्वांचेचं ड्रेस मळले होते त्यामुळे सर्व ' एकाच शापातून जातो ' या न्यायाने त्याचं कुणालाच कांही वाटलं नाही विशेषत: मुंबईचा सर्वांचाच पहिला वहिलाच दौरा होता. त्यामुळे कोणालाच काही विशेष माहित नव्हते. थोडया वेळाने ' गेट वे ऑफ इंडिया ' जवळ असल्याचं समजलं. अशा ठिकाणी हीच सायंकाळची वेळ अनुकूल असते म्हणून मीच थोडा जोर खाला. आणि सहा सात जन ' गेट वे ' च्या रस्त्याला लागलो.

येथे एक गंमत सांगण्या सारखीच आहे. सर्वजन ' गेट वे ' च्या प्रवेशद्वारा जवळ जातो न जातो तो काय आश्चर्य ! तेथे चणे, शेंगदाणे विकत बसणाऱ्यांची तारांबळच उडाली असेल त्या परिस्थितीत पडत, झडत, सांडत, आपले बोजे गुंडाळून पळतच होता. आम्ही पहातच राहिलो. पण नंतर समजलं की ' गेट वे ' च्या इमारतींच्या आवारात असल्या वस्तू विकत बसणेस मनाई आहे. आम्हीं ' त्या ' ड्रेसवर असलेने आम्हास पाहून त्याची तशी दशा झाली. नंतर आम्हाला इतकं हसू आलं की, सांगावयाची सोय नाही.



Scanned with CamScanner

मी पहिल्यांदाच समुद्र पहात होतो. समुद्राचा अफाट, अथांग परीसर पाहून मन धन्य झालं. पाण्यात बांधलेल्या अक्राळ विक्राळ इमारती प्रमाणं जहाज दुरवर नांगर टाकून उभी होती. सर्वांच्याच मनात आलं की समुद्रातून फेरफटका मारून यावा. आम्ही लागलीच एका होडीत शिरलो. होडी वल्हवली गेली. प्रत्येक लाटेशी टक्कर देत देत होती खूपच दूर गेली. होडीला जबरदस्त हेलकावे बसत होते मनात भितीची खळबळ माजली. पण दर्याविर्दि राजा हेन्री, रॉबिन्सन क्रुसो, कोलंबस, वास्को–द–गामा या धाडसी, साहसी जलप्रवाश्यांच्या आठवणीने मनांतील भिती नाहीसी झाली. माझा हा छोटासाच समुद्र प्रवास अविस्मरणिय आहे.

भुसावळ गाडी लागली. सामान लोड केलं. प्रवास रात्रीचा होता रात्री जवळ जवळ जाग्रणच त्यामुळं मी झोपण्याची व्यवस्था केली. गाढ झोप लागली होती. देवळाली स्टेशन आलं आणि माझे मित्र व सहकारी श्री. तानवडे यांनी मला उठवलं. येथून नासिक रोड आठ दहा मैलावर रहाते. सकाळचे पावणे सहा वाजलं होतं सगळीकडे रम्यप्रहरच सुंदर वातावरण पसरलं होतं. पाखरांची मंद मंजुळ चिवचिव माणसांची हळूवार चाहूल. थंड व मंद हवेची हवी हवीशी नाजूक सुळूक यामुळं माझं मन एका वेगळलाच भावणेतं प्रफुल्लीत झालं होतं. माझ्या आयुष्यातील विस दिवस येथे काढां• वयाचे होते. यांत थोडं सुख - - - आनंद - - - दुःख - - ! नुसती कलकताच !

नासिकरोड आलं. सामान उतरलं. आम्हास सेंट-रवर नेण्यासाठी तीन चार गाड्या हजर होत्या. त्यांचा हजर जबाबीपणा पाहून आश्चर्य वाटलं. त्या गाडीतून सेंटरकडे धाव घेतली. मनांत उत्सुकता भरलेली होती. सेंटरचे दुरून दर्शन घेण्यासाठी मी रस्त्याच्या रोखाने आजूबाजूला व दुरवर पाही, पण त्याचा मागमूस लागत नव्हता. आमची गाडी थांबली आणि कळलं की हे सेंटरचे पूर्वद्वार आहे. बाजूला पाहिल्यानंतर सलामी देण्याच्या अविर्भावात दोन तोफा थाटात उभ्या होत्या. आजूबाजूला गर्द झाडीच दिसत होती. जगांत दुसऱ्या क्रमांकाच हे आर्टलरी सेंटर पण त्या मानानं इथं कांहीच दिसेना. हा केवळ आमचा तात्पुरता भ्रम होता. कारण जेंव्हा आम्ही आंत शिरलो आणि हिरव्या गर्द झाडीतून पांढऱ्या मोठमोठ्या इमारती लाजत डोकाऊन आमचे स्वागत करू लागल्या त्यावेळी त्याची प्रचिती झाली.

आमचं साहित्य अशाच एका भल्या मोठ्या इमारतीतील भव्य हॉलमध्ये टाकलं. आम्हांस प्रत्येकी एक चारपाई व गादी देण्यात आली. आम्ही ते ओळीत व व्यवस्थित लाऊन घेतो न घेतो तोच चहा आला. चहाचं साहित्य घेऊन आम्ही बाहेर पडलो. चहा बरोबर चांगलीच तळलेली भरपूर भजी होती. चहा भज्यावर यथेच ताव मारून आम्ही थोडं तर–तरीत झालो.

थोड्याच वेळात कॅंप कमांडर मेजर गद्रे साहेब आले. (कोल्हापूरचेच आहेत म्हणे ते पुण्याला राहतात) त्यांनी आमचं सन्मानपुर्वक स्वागत करून या सेंटर–विषयी थोडक्यात पण सविस्तर माहिती सांगितली. त्यांच्या भाषणाचा समारोप झाल्यानंतर आम्हांस सेंटर पहाण्यास नेलं. पोष्ट ऑफिस, जेवण गृह, (याला 'मेस' असंही म्हणतात) परेड ग्राऊंड, पी. टी. ग्राऊंड, डब्ल्यू. टी. ग्राऊंड (वेपन ट्रेनिंग) तोपची-गोलंदाज (सिनेमा गृह) कॅंटीन स्कूलस् इत्यादी मोजकीच पण महत्वाची आणि नित्योपयोगी ठिकाणं दाखविली. आम्ही हे न्याहाळत असताना आर्मी सेंटर मध्ये फिरतोच की स्वप्न नगरीत वावरतोय हेच समजेना! कारण डांबरी स्वच्छ रस्ते रस्त्याच्या कडेला ठराविक अंतरावर ठराविकच आकाराच्या भव्य व सुंदर इमारती. इमारती समोर सुंदर व आकर्षक बगीचा. त्यांत रंगी बेरंगी डुलणारी सुंदर फुलं रस्त्याच्या दुतर्फा आदबशीरपणे उभी असलेली झाड. हे सेंटर आहे यांवर विश्वासच बसत नाही. एवढं करूनही आम्ही पाहिलेला सेंटरचा फक्त एक तृत्यांशय भाग होता तरी हे पहाण्यासाठी दोन अडीच तास लागले!

एकच्या जेवणासाठी आम्ही तावडतोब माघारी फिरलो. जेवणाचं साहित्य घेऊन आम्ही नुकत्याच पाहिलेल्या 'मेस' कडे गेलो. एकाच वेळी शंभर माणसं जेऊन उठतील एवढा डायनिंग हॉल आहे. हॉलमध्ये लाईट पंख्याची उत्तम व्यवस्था आहे बसण्यासाठी बाक व टेबले आहेत. चावीच्या भरपूर पाण्याची सोय अनुकूल अशी आहे. जेवण ओळीत घ्यावयाचं असतं. चपात्या मुगाची डाळ, भात, काकडीची भाजी, प्रथमदर्शनी जेवण



Scanned with CamScanner

सेंटरमध्ये सगळ्यात खेळण्याला जास्त प्राधान्य दिलेलं आढळतं. हॉकी,फुटबॉल,व्हॉलीबॉल व बेस्बॉल इत्यादींच्या ग्राऊंडचा हिशोबच नव्हता. जिकडे तिकडे खेळाची मैदानच मैदानं. मैदानांची संख्या इतकी असून देखील त्यांची व्यवस्था वाखाणण्याजोगी आहे अत्याधुनिक बांधणी, झुलणारी सतेज हिरवळ पाहून मन प्रसन्न आनन्दीत व्हायचं. यांत आम्हांस व्हॉलीबॉल थोडा प्रिय म्हणून जेथे ऑफिसर खेळत असत व विशेषतः त्याना खेळावयास जमत नसत अशा ठिकाणीच जात असू. एखादा बॉल चांगला लावला की ते खुशीत येऊन 'बहुत अच्छे! बहुत अच्छे' अशी शाब्बासकी देत. आम्ही असं खेळतेलं त्याना खूप आवडाचं. आम्हीही 'आसरांत लंगडी गाय शहाणी' या न्यायानं त्यांच्यापेक्षा थोडं चढंच होतो!

या मुदतीतच आम्हांस वेपन ट्रेनिंग मध्ये एस. एल्. आर. चे फायरिंग मिळाले. या रायफलचा नवीन शोध लागल्याने याचं फायरिंग करणारे आम्ही पहिलेच एन्. सी. सी. कॅडेट असावे. ह्या रायफलने '३०३ रायफल' प्रमाणे मागे धक्का बसत नाही. म्हणून तर हिला 'सेल्फ लोडींग' म्हणतात. पण थोडी उजव्या बाजूस धक्याने हालते एवढं कन्ट्रोल केलं की बस्! एकूण पन्धरा मार्कांपैकी मला आकरा मार्क मिळाले. माझ्या दृष्टीकोनातून हे मार्क कांही जास्त आहेत असे नाही, तरीपण 'टारगेटपर एकही गोली नही' किंवा, "बिलकुल वाशूआऊट" यापेक्षा कितीतरी बरे!

दोन चार दिवसानी स्विमींग टँक मध्ये जाण्यास परवानगी मिळाली, पहिल्यांदाच बटालियनचे आम्ही दोघेच गेलो.मी व माझा मित्र टी. एस. पाटील आम्हांस मोठ्या स्विमिंग टँकमध्ये पोहावयास मिळणार या कल्पनेनं आम्ही भारावून गेलो होतो. फार दिवसानं मनसोक्त पोहावयास मिळणार या कल्पनेनं आम्ही आनन्दीत झालो होतो. त्या आनन्दाच्या उन्मादातच गडबडीने गेलो...आणि दोघेही बन्द दरवाजाला अक्षरशः धडकलो! आश्चर्यचकीत होऊन पहातो तर काचेचा मोठा दरवाजा बन्द होता. त्याला बसवलेल्या काचा इतक्या स्वच्छ व बाजूची चौकट इतकी आकर्षक होती की तेथे दरवाजा आहे हे सांगूनही पटलं नसतं. या घटनेनं आम्हांस हसून हसून पुरेवाट झाली! तर त्यादिवशी सुट्टी होती.

दुसरे दिवशी 'दुध भाजले म्हणून ताक फुंकून पाल्या' प्रमाणे दरवाजा खुला असूनही दक्कतत्र आत प्रवेश केला. आतील व्यवस्था पाहून आम्ही थक्क झालो. अगदी जिकडे तिकडे काचेसारखी स्वच्छता टापटीप! कपडे ठेवण्यास आकर्षक खण, मोठ्ठा आरसा कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र खोल्या, पोहण्यासाठी काठावर आलो वातावरण प्रसन्न होतं. पाणी निळसर स्वच्छ होतं. मन प्रफुल्लीत होतं. निरनिराळ्या सिनेमातील आकर्षक स्विमिंग पुल नजरेसमोर तरळू लागले. आणि मारला सूर----! खूप पोहलो---! मनसोक्त खेळलो---- (बॉल वगैरे खेळण्याची साधणे होती) याचं पाणी नंतर बिघडलं गेलं. त्यामुळं ते बन्द ठेवलं.

दिवसभर श्रमलेल्या जीवाची करमणूक करण्या-साठी तेथे सिनेमागृहेही आहेत. सेंटर मोठं असून सात आठ हजार (अंदाजे) लोकसंख्या असावी. यामुळं तेथे दोन थिएटर्स धुमधडाक्यानं चालतात. 'तोपची' हे एक थिएटर आहे याचं गांव सेंटरला मिळत जुळतच आहे. याची बांधणी अधुनिक आहे. यांतील स्वच्छता व सिस्त नजरेत भरण्याजोगी आहे. तिकीटदर अगदीच कमी. याचा फायदा आम्ही बराच उठवला! तीन चार दिवसात चित्रपट बदलत असल्यानं त्याचा आम्हांस चागलाच उपयोग झाला! इथे आचकट विचकट बोलणं, उगीचचं गोंधळ माजविणं, इत्यादी आगाऊ-पणाचे प्रकार आढळून येत नाहीत. सर्वजण शांततेनं पहातात. विनोदापुरतं तोंडभरून मनमोकळेपणानं हस-तात. टाळ्यांच्या कडकडाटाने अभिनयाचा गौरव करतात बस् बाकी सर्वत्र शांत! ही तेथील सिस्त जवानाकडून घेण्यासारखी आहे.

दुसरे 'गोलंदाज' हे नांवही सेंटरला साजेसच आहे. मात्र हे ओपण असून सभोवती तट आहे. बांधणी उत्कृष्ट असून आंत बसण्यासाठी कॉंक्रीटची बाकडी टाकली आहेत.जमिनीवर भारतीय बैठकही मारता येते. याच्या पहाणीविणा सिनेमा पहाण्याचा योग काही आला नाही.

Scanned with CamScanner

या शिवाय येथे मोठं व सुंदर असे नाट्यगृह आहे. हे आमच्या निरोपाच्या पार्टीच्या वेळी कळले. यांतच आमचा निरोप समारंभ पार पडला. या थिएटर-मध्ये पडदे वगैरे आकर्षक असून, साऊंड सिस्टिम चांगली आहे. बांधणी व रचना उत्कृष्ट व अद्वीतीय आहे. तेथे महिन्यातून एक दोन नाटके होतात असे समजले. आमच्या कारकिर्दीत तरी नाटक पहाण्याचा योग आला नाही.

या विस दिवसाच्या कॅंपमध्ये आम्हास एक दिवस 'आऊट डोअर' या सदराखाली येथून आठ नऊ मैलावर असलेल्या 'पांडव पहाडी' येथील प्रसिद्ध कोरीव लेणी पहावयास नेलं.. सर्व इक्विपमेंट, एक—वेळच्या शिदोरीसह आम्ही सेक्शनवाईज मार्च केलं. पावसाची रीमझीम सुरु होती. आकाशात ढगांची स्पर्धा लागली होती. उन–पावसाचा रंगदार खेळ रंगला होता. या वातावरणांत चालण्यात किती मौज येत होती ? बरोबर बाराला पांडव पहाडीवर अटॅक केला. सर्व मुर्तिची पहाणी करताच मी थक्क झालो. कोणत्याकाळी एका महान कलाकाराच्या टाकीतून उतरलेली ही कलाकृती आताच पूर्ण झाली की काय असे वाटते. कोरलेल्या मुर्तिचं एवढं आश्चर्य वाटत नाही पण दगड विटानी बांधताही येणार नाहीत अशी अद्वितीय देवळे कोरलेली पाहिली की आपल्या प्राचिन कलाविषयक विकसित संस्कृतीची कल्पना येते. या पहाडीचं नांव जरी 'पांडव पहाडी' असलं तरी मुर्त्या मात्र भगवान बुद्धांच्याच दिसून येतात.

सेंटरची भव्यता दिव्यता पाहून मला सेंटरची पहाणी करण्याची तीव्र इच्छा झाली. म्हणून मी मित्रा-समवेत सायंकाळच्या वातावरणांत फिरावयास जात असे. एके दिवशी आम्ही दोघं फिरत असताना रस्त्यावर मंदिर लागलं. अधिक चौकशी अंती हे राधाकृष्णाचं मंदीर आहे असं कळलं. अर्थात आमचे पाय तिकडे वळले. पण हे हिंदूधर्मांचं मंदिर असावं असा विश्वासच बसेना. कारण सभोवार गर्द आकर्षक बगीचा, निर–निराळी मनमोहक फुलझाडे, शोभेची झाडे, कोवळी रंगीबेरंगी झुलतेली कोमल फुले. सर्वत्र स्वच्छता, प्रसन्नता कांही विचारावयास नको. आम्ही अजून देव–ळात गेलो नसलो तरी अशा व्यवस्थेचं, स्वच्छतेचं हिंदूधर्माचे देऊळ मी प्रथमच पहात होतो. आम्ही गेटच्या आत प्रवेश केला. कॅनवास शूज होते अर्थात ते उतरावं लागलं. जवळच पाण्याचं पिप व टॉवेल ठेवला होता. तेथे आम्हांस हातपाय धुवावयास विनवलं. थोडा स्नो लावून मेक्अप् केल्याने तोंड धुवावयास मी वर खाली पहात होतो. पण पुजाऱ्याची आज्ञा होताच धुवावच लागलं! (आमचा मेक्अप् बिघडला एवढंच!) आम्ही त्या शांत देवळात संथपणे प्रवेश केला. तेथील व्यवस्था, स्वच्छता, प्रसन्नता यात मन आनंदून गेलं. मी अनेक देवळे, तिर्थक्षेत्रे पाहिली पण माझ्या झाल्या–गेल्या जीवनांत इतकं सुंदर व पवित्र मंदीर प्रथमच पहात होतो! मी नास्तिक असूनही अशा पवित्र प्रसन्न वातावरणांत विसावलेल्या राधाकृष्णाला माझे नकळत सौजन्याने हात जोडले गेले. मनांत नसूनही वेळेअभावी पुजाऱ्यांनी दिलेलं तिर्थ चाटतच उठाव लागलं.

या सेंटरमध्ये जवळ जवळ प्रत्येक धर्माची देवळे आहेत. शिखांच नानक मंदिर आहे, ख्रिश्चनांचे चर्च आहे. रात्री येथे प्रवचने वगैरे होतात. रविवारच्या सुट्टीच्या दिवशी तेथील भाविक जवान आपआपल्या धर्माच्या मंदिरात दोन दोन तास मोठ्या भाविकतेने घालवतात.

जिमल्याशियम हॉल देखील पहाण्यासारखा आहे तेथील होणारे कसरतीचे प्रयोग पाहून मन थक्क होते. डोळ्याचं पारणं फिटतं.

या काळांत आम्ही जवानांच्या सहवासात जास्त रमलो, त्यांचं होणारं हाल, त्यांना होणारा त्रास, त्यामुळे त्यांचे केविलवाणे होणारे चेहेरे हे आम्हांस पहावत नसंत. कोणी या टिचभर पोटासाठी- - -कोणी देशासाठी – – – कोणी दुसऱ्यासाठी – – – कोणी आई वडीलासाठी – – – कोणी जीवन जगण्यासाठी – – कोणाचे हेतू उदार, कोणाचे उदात्त, कोण स्वार्थी! पण ध्येय एकच. देश सेवा! त्याना सकाळपासून एक



Scanned with CamScanner

वाजेपर्यंत परेड शिवाय दुपारी तिनला रखरखत्या उन्हांत बाहेर पडावं लागत असे. ह्या शिवाय बागकाम इतर ड्युट्या यामुळं बिचाऱ्याना एक तास देखील विश्रांतीचा मिळत नसे. आणि सर्व कसं वेळेवर आणि चांगलं झालं पाहिजे नाहीतर खडतर शिक्षा व न ऐकवण्या जोग्या शिव्या !

सहाजिकच आम्हांस त्यांच्याबद्दल न कळत सहानुभूति, आपुलकी वाटू लागली. आम्ही त्यांच्या सुख–दु:खात सहभागी होण्याचा प्रयत्न करीत असे. त्यांच्याकडूनही तसाच प्रतिसाद मिळे. कोणी आम्हांस पाहुणे म्हणून, कोणी गांववाले, कोणी मित्र, कोणीं भाऊ या जवळच्या नात्याने ते आमच्याकडे पहात. आणि विशेष म्हणजे आपल्यापेक्षा त्यांच्यात किती आपुलकी असते. याचं एकच उदाहरण सोलापूरचा एक जवान होता त्यानं आम्हांला विचारलं, "सोलापूर जिल्ह्यांतील कोण आहे का ? " आमच्यात दुर्दैवानं सोलापूर जिल्ह्याचं कोणी नसल्यानं नाही म्हणून सांगावं लागलं. तेव्हा तो म्हणाला की, " सोलापूरचे नसेना का आपण आलाय त्यात किती तरी समाधान वाटतंय, " हे तो सहजच बोलून गेला. पण माझ्या मनांला चुटपुट लाऊन. किती त्याचं थोर हृदय. किती व्यापक त्याचे विचार, त्याच्या त्या विशाल अंत:करणाची स्तुती-कौतुक मी येथे कसे करू ?

असंच बोलता आम्ही सहानुभूतिनं एकाला विचारलं," क्यों भाई आपको तो बहुत तकलीफ उठानी पडती है । हमें देखकर यह बुरा लगता है । " यावर तो लागलीच म्हणाला, " तकलीफ तो किसीभी काममें उठाने पडती है। भाई, मगर तकलिफ उठाणेसेही बडी मजा आती है । पहले कठीण लगता है लेकीन बादमे आदत पडेगी तो कुच्छ नही होता । " सर्वजण अगदी याच साच्याचं उत्तर देत. त्यांच्या मुलाखतीतून स्वाभीमान,देशाभिमान, आपलेपणा,विचारीपणा आणि दयाळूपणाही दिसून येतो. परत त्यांच्या वागणूकीतून सौजन्यपणा आदरणीयता प्रामाणिकपणा इत्यादी सद्गुण दिसतात. यांत एम्. ए.–एम्. कॉम् चे पदवीधरही होते.

त्यांच्याही तोंडून वरील उद्गार पडत असत. एका विद्यार्थ्यानं तरी चक्क सांगितले की, " मिलिटरी एवढं कशातच सुख नाही. "

सर्वजण रंगात आले की, हास्य, विनोद यांच्या रसरशीत दंगात तेथील आपली हालत व्यक्त करीत. बोलता बोलता एकजण डॉक्टर तपासणी विषयी सांगू लागला, " हर पन्धरह दिन हमको नंगे होकर डॉक्टरके पास जाना पडता है । एक एक कमरेमें सात आठ आदमी नन्गेही छोडते है । हम बहुत शर्मिंदे होते है ।" अशासारख्या व्यथा ते हसत हसत सांगत असत. यावेळी मला आमच्या येथील डॉक्टर तपासणीची आठवण झाली– – – – !

आम्हांस येथे लाभलेले शिक्षक हे अगदी कर्तव्यतत्पर ममताळू होते. जे आपल्याजवळ आहे ते सर्व द्यावं या ध्येयाने ते आम्हांस अगदी तळमळीन शिकवत. नाहीतर टाईमपास, वायफळ गप्पा असं कुठं दिसत नव्हतं. 'ड्युटी म्हणजे ड्युटी' हे त्यांचं तत्व फावल्या वेळात ते आमच्यात आपुलकीणं आस्थेने मिसळत आमच्याशी थट्टा मस्करी, हास्य विनोद, सुख-दु:ख याबाबत मोकळेपणानं बोलत. परेडच्या वेळी परेड. ते हुकूम बद्द होते. ते आम्हांस म्हणत " आप कॉलजके पढेलीखे आदमी है । आपको इतना तंग करते समय हमें भी दु:ख होता है । पण लागलीच आम्ही त्यांची समजूत घालत असू.

आम्हांस प्रत्येक रविवारी सुट्टी मिळत असे सुट्टीच्या दिवशी अर्थात ' आऊट पास ' घेऊन आम्ही शहरात जात. शहर अगदी उत्तम आहे. शहरात मोठमोठ्या गगनचुंबी इमारती नसल्या तरी छोट्या पण आकर्षक बांधणीने त्या भूषविल्या आहेत. तेथील लोक प्रामाणिक, भाविक,धार्मिक व सौजन्यशील दिसून आले त्यांची वागणूक समंजस व आदरणीय वाटली. प्रसिद्ध ' मुक्तिधाम ' मंदिर येथेच आहे. पोलीस ट्रेनिंग कॅंप ही येथेच थाटलं आहे. गोदावरी गळीं रूळते आहे पंचवटीच्या पवित्र्यानं शहर मंगल वाटतं



Scanned with CamScanner

पहाता पहाता विस दिवस केंव्हा गेले कांही समज लंच नाही. आलो तेंव्हा कसे जाणार याची चिंता वाटत होती. पण कशाचीच आठवण न येता पुर्वजन्मीचं माहेर असल्याप्रमाणं मी तेथे रमलो. शेवटी वर उल्लेखलेल्या नाटचगृहात सेंटरतर्फे आम्हास पार्टी देण्यात आली. मोठमोठे ऑफिसर जातीनं हजर होते. आमचे सर्व शिक्षक एकत्र आले होते. त्यांच्या चेहऱ्या-वरील ताटातुटीच्या दुःखद छटा पाहून माझ्या मनांत खळबळ माजली. एरवी कठोर व निष्ठूरतेचा आंव आणणारे सर आज त्यांना होणारं दुःख आवरताना पाहून आम्हाला वाईट वाटले. इतर जवान देखील आमची भेट घेऊन, " याद रखों भाई जीवनमें कौन कसीको देणे घेणेसे सुखी नही होता लेकीन चार मिठ्ठि शद्बोंका आदमी भूकेला है ।" असं म्हणून शुभेच्छा देत हात मिळवून निरोप देत. पुनर्जन्मावर विश्वास नसुनही इरावती कर्वेच्या शद्बात म्हणावसं वाटतं, " पुर्वजन्मीचे लागेबंधे असल्याशिवाय माणसा माणसांच्या गाठी भेटी होत नाहीत. नाही तर देशाच्या काणाकोपऱ्यातल्या माणसांचा असा एकत्र संयोग होऊन एकत्र संबंध येणं म्हणजे नवलच नाही ना ?

या विस दिवसाच्या सुखद दुःखद स्मृति आठवतच माघारी येण्यासाठी सेंटरचा अखेरचा निरोप घेऊन गाडीत पाय ठेवला.

* *

## मळे

रात वादळी वादळी
सोसाटयाचा तो वारा
नाही आसरा निवारा
धुळी मातीच्या त्या धारा

रात वादळी वादळी
शब्द मोडले, झडले
गेले सुरहि विरून
मुके आसू सुकलेले

रात वादळी वादळी
थंड तृप्त ते थैमान
भोवरा तो हिडीस अन्
गेले फूल कुस्करून

अशी वादळे वादळे
जसे निर्माल्याचे मळे
गल्लीबोळातून सौदा
भरभरले गाळे



Scanned with CamScanner

# शब्द

माझ्या समोरच्या खिडकीतून मला मेघांची रांग दिसते आहे. काळे, निळे, हिरवे, पिवळे, तपकिरी, किरमिजी आणि कित्येक रंग असे पसरलेले आहेत कि, त्या रंगाना नांव देणे अजून शब्दशास्त्रज्ञाना जमलेले नाही. आणि शब्दांच्या बाबतीत तर मी अगदीच दुबळा आहे. कांही ठराविक शब्दाशिवाय मला बोलताच येत नाही. आज पर्यंतच्या माझ्या आयुष्यात जे शब्द आले ते वापरून वापरून ओढयातील गुळगुळीत गोटयाप्रमाणे झाले आहेत. परंतु तुमच्या आयुष्यात खूपच शब्द आले असतील ? देव तुमचे भले करो !

तेच तेच शब्द वापरून मी जवळच्याशी आणि दुसऱ्याशी बोलत असतो--लिहीत असतो. माझ्या अनुभवांचे विश्वही अगदीच तोकडे आहे. या चार, सहा, आठ भिंतीबाहेर दहा, बारा रस्त्यांच्या पलिकडे माझे शब्दही भटकत नाहीत. भटकतात म्हणजे काय ? मीच त्या शब्दाना घालवतो-जा निघा येथून, माझ्याजवळच काय काम आहे ? जा बाहेर-बाहेरची विद्वान मंडळी, चतुर मंडळी, प्रोफेसर मंडळी आणि बोलताना इंप्रेशन मारणारी मंडळी किती किती परिन आणि कसे कसे शब्द वापरत असतात जाऊन तरी पहा !

शब्द बिचारे ! जातात, पण हिरमुसल्या तोंडाने, खाली मान घालून, मी घरी नाही अस पाहून घरी परत येतात. व माझी चाहूल लागताच, हिन्दी, मराठी, इंग्रजी, सायन्स सारख्या पुस्तकात तोंड लपवून बसतात--बसतात कुठचे ? अद्यावत फॅशनेबल असे माझ्या पुस्तकातील शब्द माझ्या पुराण, बोथट शब्दाना थोडेच बसू देतात. मग भिऊन ते चंद्रकांत काकोडकर, बाबूराव अर्नाळकर, एस. एम. काशिकर इत्यादिंच्या पानामध्ये लपून बसतात पण तेथूनही त्याना लाथ बसते. मग काय करणार ? सरळ जुन्या शब्दकोशांच्या पानात जागा दिसेल तेथे रडत बसतात. आणि भलता दरारा आहे माझा या भंपक, बावळट शब्दांवर !

शब्द ! कशावरून नि कुठे घसरलो-छे उगीचच कुठेतरी वहात चाललो आहे. खिडकीतून दिसणाऱ्या आभाळातील वहात जाणाऱ्या ढगांच्या आकारासारखा निसटत्या नितळ रंगासारखा ! वा वा ! नितळ-काय शब्द-आहे ! सुंदर ! वंडरफूल ! आमची इतर दोस्त मंडळी वापरतात म्हणूनच वापरला मी हा शब्द-माफ करा ! नितळ या शब्दाचा नक्की अर्थ काय आहे अस जर, दरडावून विचारलात तर, सरळ तुमच्यासमोर कान धरून चार उठाबशा काढीन नि चुकलो, मला नितळ या शब्दाचा अर्थ माहीत नाही-आय ॲम व्हेरी सॉरी-अस म्हणत एखाद्या मख्खा सारखा उभा राहिन.

मघाशीच एका ढगात मला तो पिळदार अवयवाचा दारासिंग अधिक सॅंडो अधिक कॅशिअस क्ले दिसला नि मी त्याच्या रेखीव मसल्सकडे मत्सरानं टक लाऊन पहात राहिलो. आणि तेवढयात तो सॅंडो एखाद्या जख्ख म्हाताऱ्या सारखा दिसू लागला-आणि जराशान त्या थेरडयाच्या शरीरातून रूपात आणि यौवनान भरलेली अशी लेला अधिक विलओपात्रा अधिक वैजयंतीमाला अधिक xxxx आणि शेवटी तर महालक्ष्मी एक्सप्रेस मधली ती रानवट तरूण पोर बाहेर आली नि तिंन नेसलेले चक्क फेंडून हां हा म्हणता त्या निळयाशार आकाशात गडप झाली !

माझ्या मनातल्या आभाळात असेच चमत्कारीक नि विलक्षण शून्य आणि रिकाम्या भावनांचे पोकळ ढग रंगाचे नि आकारांचे कपडे पेहरून येतात व पोहत रहातात. नि लगेच वितळून, विरून, वाळून धूर होतात ! सुंदर देखणे कुरूप विद्रुप आकारहीन रंगहीन अर्थहीन ! शब्द !

आर. एन. देवार्डे
पदवी पूर्व कला (अ)



Scanned with CamScanner

# आईची महति

१) आईचं प्रेम जिथे असेल ती झोपडी राजेश्वराच्या ऐश्वर्यालाहि लाजविल. हे प्रेम जिथे नाही, त्या माड्या, महाल व दिवाणे म्हणजे स्मशाने होत.

– साने गुरुजी

२) आईची पुजा म्हणजे वत्सलतेने उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पुजा, माऊली म्हणजे निस्सीम सेवेची मूर्ती, उत्कृष्टातील उत्कृष्ट परमेश्वराची पुजा म्हणजे मातृपुजा होय. 'आई' या शब्दाहून आणखीन उच्च शब्द आहे कोठे ?

– रविंद्रनाथ टागोर

३) जगातील कोणत्याहि गोष्टीच्या स्मृतिपेक्षा आपल्या आईची आठवण अत्यंत सुखद असते.

– कवि यशवंत

४) आईच्या रागाच्या पाठीमागे वात्सल्याचा सागर उचंबळत असतो.

– साने गुरुजी

५) आईच्या प्रेमात गाईच्या दुधाची मधुरता असते.

– प्र. के. अत्रे

६) आई गेली तरी तिची कृपा मरत नसते, तिचा ओलावा आपणास आतून नेहमी मिळतच असतो.

– साने गुरुजी

संग्राहक– लांडे बी. आर.
एफ. वाय. बी. ए.

Scanned with CamScanner

# सुवर्ण कण

१) स्त्रीचे प्रेम हे नेहमी मत्सराने मर्यादित झालेले असते, ठिसूळ जमीनीतून वहात जाणाऱ्या नदीचे पाणी हे जसे तटावरील डगरी ढासळून वारंवार गढूळ होते तसा स्त्रीच्या प्रेमाचा ओघ संशयामुळे सारखा कलूषीत होत असतो.

२) कला ही जीवनाची सावली नव्हे. तर त्याला पूर्णता आणण्यासाठी धडपडणाऱ्या मानवी कल्पकतेचा फूलोरा आहे. दडपून टाकलेली दु:खे, अवरून टाकलेले अश्रू, अपुऱ्या राहीलेल्या आकांक्षा, सफल न झालेली स्वप्ने, याची सारी आर्तता, सौंदर्य, ओज, कला प्रकट करते.

३) वेल ही स्वत: कितीही नाजूक असली तरी काटेरी कुंपनावर ती वाढू विस्तारू शकते. तीची हिरवीगार पाने व मधूर हसरी फूले त्या कुंपणाचे काटे झाकून टाकतात. पण स्त्रीचे मानवी सृष्टीतील लावण्यलतीकेचे मात्र तसे नाही. तिला आश्रयासाठी फूला फळानी वहरलेला वहरण्याची खात्री असलेला भव्य वृक्ष हवा असतो. विज पडून कोसळलेल्या वृक्षाचे पर्णहिन अंग आपल्या पाना फूलानी झाकणारी आपल्या मृदूतेने त्याच्या वटलेल्या जिवनाला माधूरी आणण्याची स्पृहा धरलेली स्त्री आज शिकलेल्या पदवीधर मुलीत सुद्धा सहसा आढळणार नाही.

४) जीवनाला माधूरी आणणारे, मनाला मृदू बनविणारे दु:खासारखे रसायन नाही दुसरे जगात रोज पायदळी तुडविले जाणारे गवत रात्रभर पडणाऱ्या, दवबिन्दूच्या ओलाव्याने जगते, वाढते. त्याप्रमाणे अनूकंपेने ओथबिलेल्या डोळ्यातून पडणाऱ्या आसवानी (म्लान) झालेल्या भावना अुमलतात–वहरतात.

प्रेषक– रमाकांत अेम्. शिंदे,
पदवी पूर्ण वाणिज्य

Scanned with CamScanner

# जाळं

रंगराव पाटील
तृतीय वर्ष साहित्य

" कसलं ध्यान चाललंय म्हणायचं तरी ! "

सांजावलं, पौर्णिमेची रात्र. मावळलं तसं उगवलं. वाड्याच्या परसातील किरणं मावळतीकडं सरकली अन् उगवतीकडं उतरत गेलेल्या पायऱ्या चढून चांदणं पडदीत पसरलं. पाटलांनी कन्दीलाची याद केली नाही. भक्तीभावानं चन्द्राला हातही जोडलं नाहीन. पडवीच्या एका कोपऱ्यात हवेला घातलेल्या लाकडी खाटेवर तक्क्याला टेकून ते विचारात हरपून गेलं होतं. समोरच्या खांबचं सावट त्यांच्या अर्ध्या अंगावर पडलं होतं. जनाबाई चौकटीच्या आधारानं पडवीत डोकावल्या. पडवीतली शांतता त्याना कसीशीच वाटली. पाटलांच्या करड्या चेहऱ्यावर विचाराचं सावट पाहून त्यांना त्यांची किव आली. म्हणून त्या म्हणाल्या,

" कसलं ध्यान चाललंय म्हणायचं तरी! "

जनाबाईंच्या बोलानं पाटलाना जाग आली. भारावलेला पाय जवळ घेऊन दुसरा पाय सरळ करीत ते नुसतं हुंकारलं. पुन्हा मुक्यानंच थोडा वेळ गेला. घटकाभरानं कोपऱ्यात पाल चुकचुकली. पाटील पुटपुटलं,

" क्रिष्ण ! क्रिष्ण ! ! "

" सज्जन येईल आताच्या गाडीनं. " अवघडून उभ्या असलेल्या जनाबाई म्हणाल्या.

" हूं ऽऽऽ" पुन्हा पाटलांनी नुसता हुंकार फोडला.

" हूं . . . म्हणजे ? "

" तार बघून ऱ्हायचा नाही. "

" आल्या आल्या विचारील तारेबद्दल . . . . काय सांगायचं तरी ! "

" डोंबल ! "

" म्हणते, किती जीवाला लाऊन घ्यायचं ते ? किती जळायचं माणसानं ? "

" हं ऽऽ किती जळायचं. . . . . नाही- मी जळत नाही. . . . माझी . . . या वाड्याची आब्रू जळते. आता गाढवावर बसवून धिंड काढा माझी गावातून. . . . आणि तेवढंच काय ते राह्यलय मागं. "

" घडलं ते कुणाला हवसं होतं का ? यातून मार्ग नको का काढायला ? "

" काढा. . . खुषाल काढा मार्ग. . . पण उगीच माझं डोकं खाऊ नका. "

आणि पाटलांनी तोंड बंद केलं. जनाबाई माजघरात वळल्या. आण्णा माजघराच्या भिंतीला टेकून

Scanned with CamScanner

आई-वडीलांचं बोलणं ऐकत होता. तो नुकताच मळयातून आला होता. चांगला शिकलेला पण नोकरीत त्याला रस नव्हता. बी. ओ. ची चारही वर्षं संपवून त्यानं शेतीकडं लक्ष द्यायला सुरूवात केली होती नाही तरी शेतीचं बाबांना आता निभवत नव्हतंच. गडी माणसं राबऊन घेणं त्यालाच भाग होतं. सज्जन त्याचा मोठा भाऊ जरूर नसताना नोकरीच्या फंदात पडलेला. 'आजपर्यंत या वाडयातून नोकरीसाठी कुणीही बाहेर-गांवी गेलेलं नाही. या उपर कुणाला जायचं असंल तर खुषाल जावं त्याना त्यांचं मार्ग मोकळं आहेत'' बाबांची ही पडत्या फळाची आज्ञा समजून सज्जन मुंबईला एका बऱ्यापैकी कंपनीत नोकरी करीत होता. सहा महिन्यापूर्वीच त्याचं लग्न झालं होतं. सूनबाई गुणी भेटली म्हणून सासू-सासरे खुषीत होते. शिकलेली नाही पण घरंदाज आणि समजुतदार म्हणून तिच्यावर सर्वांची मर्जी होती. हे सारं गृहचित्र आण्णाच्या डोळ्यासमोरून सरकू लागलं.

'आण्णा केव्हा आलास मळयावरून?'

'आत्ताच – – –' आईला समोर पाहून आण्णा अस्पष्ट पुटपुटला आणि न्हानीघरात गेला. पायावर पाणी घेऊन टॉवेल शोधू लागला. पार्वतीनं स्वयपाक-घरातून आण्णाच्या अंगावर टॉवेल फेकला.

' सूनबाई – – – आताशा काय झालंय असं उपऱ्यागत वागायला? '

'विटाळ होतोय भावजींना – – – जवळ जायची सोय नाही त्यांच्या - - - दिलाच नसता मी पण ते शोधू लागले म्हणून - - - तेही राहील आजपासून'

आण्णानं आवंढा गिळला. जनाबाई उगीच राहृयल्या शब्दाला शब्द वाढवायचा नव्हता त्याना. पारू अलीकडे वरचेवर वर्देळीवर येत होती; तरी जनाबाई सांभाळून घेत होत्या. त्यांच्या जीवाला कात लागली होती. मनानं झुरणी घेतली होती. आण्णाला चहा आणायला म्हणून त्या स्वयपाक घराकड वळणार तोच पाडवीतून सज्जनची हाक आली.

' आई – – – कुठं आहेस ? '

' सज्जन ऽ ऽ ऽ कितीरे वाट पहायची तुझी ! लग्न न्हाऊन गेलास तो आज परत फिरलास ! ' जना-बाई पुढं झाल्या. त्याला उराशी कवटाळलं.

' बरी आहेस ना ? तार बघून कसला घाबरलो म्हणत्येस ! '

' बघ की कशी आहे ती– – – समोरच आहे तुझ्या. '

' मग तार उगीच केली म्हणायची तर– – – बरं आण्णासाहेब काय म्हणत्ये तुमची फळबाग? आणखी बाबा कुठे दिसत नाहीत ते ? '

' पडवीत झोपलेत. ' आण्णा हासला. पण आळवावरचं पाणी वरंगाळावं तसं त्याचं हासू क्षणात लोपलं.

– – – जेवणं झाली. कोण कुणाशी कारणा-शिवाय बोललं नाही. एकटा सज्जनच काय तो बडबडत होता. पार्वती त्याच्याशी बोलायचं टाळीत होती. लाज-ण्यांचीच ही रीत म्हणून तिचं त्याला काय वाटलं नाही.

सगळी झोपायला गेली पण जनाबाईना झोप येत नव्हती. त्या अंथरूणात तळमळत होत्या. डोळ्यातील कढत आसवांनी उशी भिजवीत होत्या. त्यातच देवघरा-तील कुजबुज त्यांच्या कानावर पडली. त्यांच्या पोटात धस्स् झालं.

' नाही – – – नाही – – – दूर व्हा – – – आता ते शक्य नाही '

' म्हणजे ? काय झालं तरी काय ? '

' हं – – – काय झालं ? आगीजवळ लोणी ठेऊन खुषाल पळ काढलीत – – – त्यावर मायला फावलं ते आज. सांभाळायची नव्हती तर विहिरीची वाट का दाखवली नाही लग्न झाल्याबरोबर ? '



Scanned with CamScanner

' अगं स्पष्ट सांग ना - - - असं कोड्यात काय टाकतेस ? '

' ऐकायचंच असंल तर दम धरा. आज या वाड्यात कुणाला झोप नाही. भिंतीभिंतीला कान भिडलं असतील. आब्रूचं खोबरं झालं आधीच. ते उधळायला लावू नका मला. '

' पार्वती तुला वेड-बिड लागलं नाही ना ?

' बरं होईल. निदान वेडी म्हणून तरी जगाच्या नजरेतून सुटेन. मेंली भोगायची ही चोरी या जन्मात निदान कर्माची फळं उघड्यावर तरी उधळायला मिळतील, वेडेपणाच्या नांवावर ! '

- - - आणि त्यानंतर बराच वेळ हुंदकं येत राह्यलं. जनाबाई निपचित पडल्या होत्या. अंग लोळा–गोळा झालं होतं. गात्रं थिजली होती. मनानं धास्ती घेतली होती. घडलं यावर विश्वास बसत नव्हता पण डोळं विश्वास घात करीत नव्हतं. कान दगा देत नव्हतं. जखमेच्या वेदना जखमेतच रट्रट्न होत्या. रक्तच काय ते ओघळायचं उरलं होतं.

पहाटेच सज्जन मळ्यावर जायला निघाला. जनाबाईनी त्याच्याकडचं लक्ष नसल्यासारखं केलं. ' कुठे चाललास ?' म्हणून विचारलं नाही. आपल्या पांढऱ्या केसावरून त्या हात फिरवीत राहिल्या. पडवीत झोपलेल्या सासऱ्यावर ओझरती नजर टाकून पारूही वाड्याबाहेर पडली. जनाबाईचा फिरता हात थांबला. नजर दरवाजात खिळली. वेड्यासारख्या त्या पहातच राहिल्या.

मळ्यात वस्तीच्या घरासमोर सज्जन ताटकळत होता. पारूला आलेली पाहून तो घरात शिरला पाठोपाठ पारूही आत गेली. सारं अंग झाकून ती अवघडल्या स्थितीत भिंतीला टेकून उभी राहिली.

' पार्वती काय प्रकार आहे ? ' तिन नुसतं वर पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावर अतूरता होती.

' कसं सांगू ?' तिनं पुन्हा खाली मान घातली. हुंदका आवरला.

' किती अंत पाहणार आहेस गं ?' सज्जनने लाडीकपणे तिचा हात धरला. गोंजारला. पण तिनं झट्कन हात सोडवून घेतला. तोंड झाकायला पदर उचलला आणि तिचं उभार पोट त्याच्या नजरेस पडलं. त्याला शिरशिरी आली. त्याच्या मनाचा थरकाप उडाला. हातपाय लटपटू लागलं. तिच्या गालावर एक सणसणीत थप्पड लगावून थडथडते दात आवरीत तो म्हणाला,

' म्हणे, कसं सांगू ! सांग की शेन खालं म्हणून. '

आणि दुसऱ्या गालावर बसलेल्या थपडीनं तिच्या डोळ्यासमोर काजवं चमकलं. मग एकामागून एक थपडा तिच्या गालावर वाजू लागल्या.

'ऐकून तरी घ्या' ती चित्कारली. त्यानं हात सावरला.

'सांग काय सांगायचं ते'

'एकदाच आले होते शेतावर' ती तोंडाला पदर लाऊन हुंदक दाबीत म्हणाली 'सासूबाई होत्या बरोबर त्या परतल्या भाजी घेऊन. मी थांबले - - - एकटीच - - - संतू भाजी काढून दिल ती घेऊन ये'असं सासूबाई म्हणाल्या म्हणून - - - '

'कोण? संतू?'

'त्याचा संबंध नाही. पुढ ऐका मला घरात बोलावलं; कायतरी निमित्त सांगून. मी गेले. त्याच मी मन ओळखलं नाही - - - आणि - - - ' ती सुस्कारू लागली.

'पण कोण तो?' गालफाडाजवळ गेलेला त्याचा हात तिनं धरला अन् म्हणाली,



Scanned with CamScanner

— 'ऐका आदी. मग जीव द्यां हवा तर माझा' थोडा वेळ थांबून ती म्हणाली, 'मग मी विहिरीत पडायला गेले. पण त्यांनी तसं करू दिलं नाही. ते रोजच माझ्या पाळतीवर राहू लागलं. मला मरणं अशक्य झालं आणि जगणंही अशक्य झालं. मी कुणाला बोललेही नाही याबद्दल. प्राणापेक्षा घराण्याची आब्रू मोलाची वाटली मला.'

'पण कोण तो? नांव काय त्याचं?' त्याच्या डोळ्यात रक्त उतरलं.

'तुमचा भाऊ - - - भावजी — — — ती कापऱ्या आवाजात म्हणाली.

'कोण? आण्णा?' तो हाताच्या मुठी आवळीत ओरडला.

'होय — — — खोटं वाटत असेल तर ती कुऱ्हाड घ्या कोपऱ्यातली' असहायतेनं ती म्हणाली.

'हं ऽ ऽ मादरच्योद' सज्जनानं मुठी आवळल्या. पिसाळलेल्या कुत्र्यागत गुरगुरत तो पांदीला लागला. पारू शहारली पण लागलीच तिन स्वतःला सावरलं.

पारूनं उसात पाणी पाजणाऱ्या सन्तूला हाक मारली. रानटी जनावर घसघसत झाडीतून बाहेर यावं तसा पोत्यांच्या वटरात लपेटलेला सन्तू उसाच्या पाटा-तून बाहेर आला.

'काय वैनीसाब भाजी-बिजी- - —'

'भाजी नको. गांवाकडली वाईट बातमी समजलीय- - - - चल, पोहचवून ये मला. घरी मामंजींना बरं नाही, म्हणून भावजींना येता-येत नाही. चल तू- - - आटीप लवकर.'

सन्तूनं पुढं न बोलता इंजन बन्द केलं. हातपाय धुऊन शर्ट झाडलं. उन्हाच्या डोंबान त्यांनी तीन कोसा-वरचं पिंपळगांव गाठलं. पारू सरळ नारूच्या मळ्या-जवळ आली. नेसणात खोचलेले पाच रुपय सन्तूच्या हातावर ठेऊन म्हणाली,

'जा- - - - हॉटेलात खा- - - - जा[illegible] आता- - - - काळजी करू नकों माझी- - - [illegible] मालकाला सांग की पार्वतीनं जनगांवकडं [illegible] पाठ फिरवली म्हणून- - - - - पुन्हा इकडं [illegible] भानगडीत पडू नका म्हणून सांग.'

'पण- - - -' सन्तू घुटमळला.

'एक शब्द सुद्धा बोलू नकोस. जा आता'

सन्तू परतला. पारू सरळ मळ्यात शिरली. ना[illegible] धाववरच्या लिंबाखाली स्वस्त बसून होता. ती पाय[illegible] वाजवता त्याच्या पाठीमागं गेली. तिनं त्याच्या काना-जवळ आपलं हात नेऊन हळूच हालवलं. त्यानं चट्‌क[illegible] परतून पाहिलं.

'कोण- - - -पारू!'

ती खळखळून हसली. ओंजळीतून बांगड्या खळा-ळ्यात तसं हासू ओठातून पाघळलं. तो झेलीत नारू म्हणाला,

'पिंजऱ्यातनं पारवाळ सुटलं म्हणायचं!'

'होय बाबा — — — जनमांचा तुरुंगवास संपला बघ एकदाचा.'

'कसं काय फेकलंस जाळं!'

'छान! बरोबर केलं बघ सारं.'

'अगं ए- - - - तीन दिवस नांदलीस तर बाम-नावाणी बोलाय शिकलीस की! बरं बामणीबाई, काय हालहवाला सासरवाडीचा?'

'बरोबर झालं बघ सारं. बसलं असतील गुला[illegible] आता एकामेकांच्या उरावर.'

'अगं म्हणत्यात ते खोट हाय व्हय. दावणीच गुर दावणीलाच येणार. ते मस्त वडून बोंबीला लावा[illegible] बघतील; खरं ते जमायचं कसं!'

'— — — — —'



Scanned with CamScanner

'अगं गप्प का अशी ? माझं पाखरू दुसऱ्याच्या पिंजऱ्यात राहील कसं ?'

ती खुद्कन हसली. त्याच्या गळ्यात घट्ट मिठी मारली आणि त्याची बोटं तिच्या केसातून फिरू लागली. त्याच वेळी उसाचं निळं-पांढरं तुरं ओशाळलं. शेजारची बाभळ खुद्कन हसली. लाजून चूर झाली. दुसऱ्यांदा – – – – ती वेळ नारूला आठवली. त्यान पारुला विचारलं,

'पारू याद झाली असलं तुला – – – काय इसारलीस इतक्यात ?'

'हूं, बरी इसरन !'

आणि दोघांच्या डोळ्यापुढून ती घटना सरकू लागली.

– – – – – पारूच्या लग्नाचा दिवस उद्यावर आला होता. सहामहिन्यापूर्वीचीच ही दुसरी गोष्ट. ऐनवेळी आकाशात ढग जमावत तसं पाहुण्यांचं थवंच्या थवं चव्हाणांच्या वाड्यावर उतरत होतं. वऱ्हाड न्यायला आलेल्या गाड्या पाहून पारूच्या पोटात वणवा पेटला. काळजाला काटं बोचलं. मस्तकात डोंगळं शिरलं. हातातला हिरवा चुडा तिला कचकड्यागत भासू लागला. जमलेली सारी भुतावळ आपल्या वाईटावर उठलीय असं वाटून ती वैतागून गेली. वाड्यातल्या गिद्याड घाईत तिचं मन रमेना म्हणून ती परसात आली.

दिवस माथ्यावर पेटत होता. उन्हं जळत होती. जीत-जीत्रापाला जाळीत होती. जवळच्च राणात जाणाऱ्या पांदीवर चिट पाखरू नव्हतं. आसपासचं शिवार भकास दिसत होतं. ती करदळीच्या ताटव्याजवळ आली. ताटव्यावर फुलपाखरांनी गर्दी केली होती. तिच्या डोक्यात विचारांचं तांडव चाललं होतं. तिला नकोसा दिवस उद्या उजाडणार होता. त्याच्या विचारानं ती धास्तावली होती. नकळत तिन करदळीचं एक फुल खुडलं आणि कुस्करून अर्धवट उमललेल्या कळीवर फेकलं. तिच्यावर बसलेला भुंगा घोंगावत उठला. कळी वाऱ्यावरोबर गिरक्या घेऊ लागली. तिच्यावर बसायच्या नादात तो पाटशीवणीचा खेळ खेळू लागला. पण वाऱ्यापुढं त्याचा निभाव लागला नाही. पारुला वाऱ्याचा राग आला. वाड्यातली सारी माणसं तिला वाऱ्यासारखीच निर्दय वाटू लागली. तिला वाटलं, हळूच देटाला धरून कळीला थांबवावी इतक्यात पांदीतून हाक आली,

'पारू ऽ ऽ'

तिनं वळून पाहिल. पांदीत नारायण उभा होता. तिचा त्रासलेला चेहरा फुलला. पण क्षणभरच. लगेच ती गोरीमोरी झाली. गाल फुगवून म्हणाली.

'बोलू नकोस जा. कुठं व्हतास चार दिवस?'
'का?'
'मला कायतरी सांगायच हाय'
'मग सांग की'
'इथं कसं सांगायचं? कोण तरी – – –'
'मग कुठं?'
'तू कुठं चाललास आता?'
'मळ्यात'
'आणि कोण हाय तिथं?'
'कोण असणार? असणारी टाकून चालली'
'बरं नारू मी यीन मळ्यात – – तू चल म्होरं'
'मळ्यात?'
'का – – काय माशी शिकली आणि?'

आणि तो घुमान निघून गेला. तो पार दृष्टीआड झाल्यावर ती वाड्यात शिरली. पण ती वाड्यात रमली नाही. अपराधी मांजरीसारखी ती थोडी आईजवळ लुडबुडली. सगळ्यांच्या डोळा चुकवून ती परसात आली. कोण नाहीसं पाहून पांदीला लागली.



Scanned with CamScanner

तिनं मला जवळ केला. विहिरीच्या काठाला धावंवर नजर टाकीत ती केळीच्या बांधानं खोपटाकडं वळली. नारू वाटेला डोळं लाऊन बसला होता. ती खोपटाच्या ठेंगण्या दारातून आत डोकावली.

'य; किती वाट बघायची?' ओटीवर लवंडलेला नारू उठून बसत म्हणाला. पारू आत गेली.

'खरच, वाट बघत व्हतास माझी ?'

'तर काय उगीच झोपलोय व्हय? '

ती खोपटाच्या दारातून बाहेर पहात उभी होती. घटकाभर कुणीच बोललं नाही.

'उभी का? बस की' नारू तिचा हात धरून बसवीत म्हणाला. तिनं डोळ्याला पदर लावला.

'पारू, तुझ्या डोळ्यात पाणी?'

'व्हय नारू शेवटी व्हायचं तेच झालं'

'ते कळंल मला. म्हणूनच आलो व्हतो गांवात. एकदा दिसलीस तर बघून तरी घ्यावी म्हणून.' त्याच्या पापण्या ओलावल्या. तो एकटक खोपाटाच्या आडयाकडं पहात राहिला.

'एकदा बघून समाधान झालं असतं तुझं ? सुखात जगला असतास तू ? '

नारूनं तोंड उघडलं नाही. त्याला गद्‌गदा हलवीत पारू म्हणाली,

'नारू बोल की. माझ्यावाचून जगला असतास तू ? '

'मग काय करायचं ? तुझं दादा पडलं इनामदार ! '

'हं; इनामदार ! इनाम गेलं मातीत मिसळून. आता दार तेवढं व्हायलंय ! '

'इनाम गेलं नी दार व्हायलंय. खरं त्या दारातनं हुत्ती जायचं असत्यात. माझ्यासारख्या कुत्र्यासनी बंद हाय तुझं दार. '

'असं बोलू नको नारू. असं कोण बोललं तुला?'

त्याच्या गालावरून ओघणारी आसावं तिनं आपल्या पदरानं पुसली.

'तुझं दादा, दाजी चव्हाण. '

इनामदार असलं म्हणून काय झालं ! माणसं ओळखावीत माणसानं ! मग तू गप्पच राह्यलास ?'

'मग काय करणार ! मी भिकारी म्हणून त्यांच्याकडं गेलो व्हतो. तुझी भीकमा गायला. पण पसरलेल्या पदरात त्यानी शिव्यांची लाखोलो ओतली. आणि ती मी मुकाट्यानं घेऊन आलो. तुझ्यासाठी फक्त तुझ्यासाठीच पारू. ' त्यानं डोळ्याला हात लावला.

'नारू, रडू नको. माझी शपथ हाय तुला. '

'पारू पुढं काय करायचं ते तूच सांग. तू दिल्या घरात सुखी व्हायलीस तर इथं मी दुःखातबी सुख मानीन. तुझ्या आठवणीनं जळत जळत राहीन. रातीच्या राती जागून काढीन. तुझ्याकडं वड खाणाऱ्या माझ्या मनाला दावं लावीन. खरं तू सुखी व्हा त्यातच माझं सुख हाय. '

'नाही नारू. असं बोलू नको. मी आता परत जाणार नाही. तुझ्यावाचून घडीभर जगणार नाही. मी तुझी हाय. मला तुझी म्हण नारू – – – – मला तुझी म्हण. ' तिनं त्याला घट्ट मिठी मारली. मुसमुसून रडू लागली.

'पारू – – --ए माझ्या पारवाळा – – – असं धुमू नको. तू माझीच हाईस - - - तुझं माझं नातं साता

जन्माचं हाय – – – जसं झाड आणि सावलीचं–पाणी आणि मासळीचं – – – तसं तुझं आणि माझी – – – परमेश्वरबी ते तोडणार नाही ? '

' खरं – – – खरं बोलतोस नारू ? ' गळ्यातील हात काढीत पारू म्हणाली.

' अगदी खरं. '

' शपथ गे माझ्या गळ्याची. '

' शपथ घेतो खरं आदी माझं ऐक. '

' सांग – – – लवकर सांग. '

' तुझा नवरा – – – '

' कोण माझा नवरा ? नारू काय बोलतोस हे?' त्याला पुढं बोलू न देता पारू म्हणाली.

' अगं ऐक तरी आदी- – - त्यो मुंबईला हाय म्हणं ! '

' व्हय- - - - - त्यो जाऊदे मसनात. पुढे सांग. '

'– – – – – – –' त्यानं सारं सांगीतलं. समजावून दिलं. पारू कायमची आपली व्हावी म्हणून त्यानं डाव टाकला. जाळं फेकलं. तिच्या हांतात ठिणगी दिली आणि शेवटी बजावलं,

' नीट टाळकं चालाव. माणसानं आवसंच्या काळोखात उडत्या पाखराची पिसं मोजावीत. आणि हे नाही जमलं तर तो माणूस कसला ! म्हणून म्हणतो हुषारीनं जाळं टाक. न्हाईतर तुझच पाय अडकून घेशील. पांडवांचा कोण पोरगा व्हता म्हणं. रागारागानं कशात शिरला खरं भाईरच येता यीना त्येला. तसं व्हायला नको. '

' त्येची काळजी नकोमाझ्या राजा. तू पाठीवर असल्यावर मी दुनिया पालथी घालीन. '

' अगं येडे ! तेवढं काय करू नको, दुनया पालथी घातल्यावर आम्ही न्हायचं कुठं ? '

' थट्टा पुरे कर. आदी शपथ घे. '

' शपथ घीन खरं तुज्या गळ्याची नाही बाई. '

' तर– – – –? '

' याची- - - - ' म्हणत त्यानं तिच्या ओठावर ओठ ठेवलं. ती ही त्याला बिलगली.

- - - - - आणि खोपटाच्या दारातून सरपरट आत आलेली मावळत्या सूर्याची किरणं लाजली. हळू पावलानं मागं सरली. समोरच्या माडांच्या खट्याळ सावल्या खोपटात डोकावू लागल्या. दारात घुटमळणारं चावट वारं खोपटात शिरलं. धाववरची बाभळ चुड्याचा किन्‌किनाट ऐकूण लाजून चूर झाली. आणि केळीच्या बांधावरून कानोसा घेणाऱ्या धावड्याकडं पाहून खुदकन हसली– – – – –

❋ ❋ ❋

# वाचलेले, सुचलेले आणि वेचलेले

पाय

पाय म्हणजे घोट्याखालचा तंगडीचा भाग. इंग्रजीत पायाला ' लेग् ' अथवा ' फूट ' म्हणतात. कानडीत ' कालु '; हिन्दीत ' पाँव ' उर्दूत ' कदम ' आणि संस्कृतमध्ये ' पाद ' किंवा ' चरण ' असे म्हणतात.

प्राध्यापक आणि मास्तर मंडळींचे टेबल, सत्यनारायणाच्या पूजेचा चौरंग, झोपण्याचा पलंग आणि मंत्र्यांच्या खुर्च्या यानाही पाय असतात

पाय या अवयवावरच शरीराची संपूर्ण इमारत उभी असल्याने पायाला फार महत्व आहे. पाय हे कधी चपळ असतात. तर कधी जड होतात. नोकरी निमित्य इंटव्हयुला जाणाऱ्या उमेदवाराचे चपळ असतात आणि इंटरव्हयू नंतर जसे जड होतात तसे.

सभा-समारंभामध्ये पांढऱ्या टोपीचे स्वागत होते. पण पांढऱ्या पायाची मात्र घरी-दारी शोभा होते. शोभा याचा अर्थ अशुभ-अवलक्षण उदा- घरी एखादी म्हैस आणली असता घरात एखादी अशुभ घटना घडताच तो पायगुण म्हैशीचा समजून ती म्हैस पांढऱ्या पायाची किंवा अवलक्षणी ठरते.

काम होताच कांही स्वार्थी माणसे आपला जो अवयव वर करतात, त्या अवयवाला तंगडी म्हणतात, पाय नव्हे. तसेच मुलाचे पाय पाळण्यात दिसतात असा एक वाक्प्रचार आहे. मुलाचे म्हणजे नवऱ्यामुलाचे नव्हे किंवा नवऱ्यामुलीचेही नव्हे!

निवडणुकीच्यावेळी होतकरू उमेदवार उमेदवारांचे पाय धरतात- हे पाय वेगळे. आणि कांहीजण आपल्या सौभाग्यवतीची सातव्या अवघड बाळंतपणातून सुटका व्हावी म्हणून देवाचे पाय धरतात, ते पाय वेगळे. आपण आपल्या स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतो आणि दुसऱ्याच्या पायातपाय अडकवून किंवा घालून त्याला सरळ आडवा करतो.

पायातील वहाण पायात बरी, अशी एक म्हण आहे. त्याऐवजी पायातील बूट किंवा खडावा पायातच बऱ्या, असे म्हणण्याची रीत नाही. तसेच कांही व्यक्तींच्या पायावर भोवरा असतो, म्हणजे ती व्यक्ती सदा-सर्वदा भटकत असते. उदा- लोकप्रिय मंत्री-महाशयांच्या पायावर भोवरा असतो, ते आपल्यास चुकूनही कधी आढळणार नाहीत. अशा नामदार मंत्र्यांच्या पायास वहाण बांधलेली असते.

मित्रहो ! आपल्या शरीरातील ' पाय ' हा अवयव किती मनोरंजक आहे, नाही का ?

आर. एन. देवर्डि
पदवी पूर्व कला.

# प्रायश्चित

लेखक- पोवार पी. डी.
शिवराज कॉलेज, गडहिंग्लज.
टी. वाय्. बी. कॉम.

" जाई ऽऽऽ ! "

अशी लांबून समोरुन हाक आली. आणि मी दचकलो. वास्तविक ना घार, ना विचार अशा अपरिचित ठिकाणी मला दचकण्याचे काहीच कारण नव्हते. एकाच नावाची अनेक माणसे असतात की ! अशी मी मनाची समजूत करीत होतो. पण ' जाई ' या हाकेने पूर्वस्मृती घुसळल्या जात होत्या. आणि त्यातील कांही सुवर्णकण मन:चक्षुसमोर रेंगाळत होते.

आम्ही सातवीच्या वर्गात होतो. सहावीच्या वर्गात जाई आणि सुमन या दोन मुली होत्या. जाई उंच, सडपातळ. शामल वर्णाची होती. दिसायला फार देखणी दिसे, चवळीच्या शेंगेसारखे लांबसडक, तरतरीत नाक, चाफेकळी सारखे दिसायचे, पाणीदार टपोरे डोळे, विशाल कपाळ, कुरळे केस, मला सार सार कांही आठवू लागलं.

पात्र चिनार गावच्या वाटेवर होते. आकाश ढगाळलेले होते. ढगातून लागणार ऊन उष्मा वाढवित होत. उन-सावलीचा खेळ चालू होता. ढगांची छाया पिकावरुन पळे, पिकांचे वाऱ्याने झुकलेले शेंडे, पुन्हा ताठ होऊन तळपताना, समुद्रात बुडी मारुन वर उठतात असे वाटे. डाव्या हाताला उसाचा मळा, उजव्या हाताला उजाड माळ. रस्त्याकडेला एक मोठे आंब्याचे झाड होते तेथे मी बसलो. घाम पुसला. सहजपणे हात. पान तंबाखुच्या साहित्याशी चाळा करीत होते. समोर उजाड माळावरुन एक मैलावरून चिनार गावच्या शाळेचा पत्रा दिसत होता.

दोन्ही वर्ग त्या एकाच शाळेत होते. अलिकडे सहावी आणि पलीकडे सातवी म्हणजे आमचा वर्ग. मी एके दिवशी शाळा सुटल्यानंतर पाटीदप्तर घेऊन रस्त्याने जात होतो. जाई माझ्या पुढे होती. मी तिच्या जवळून जाताच ती एकदम किंचाळली.

" काय झालंय् मेल्या तुला पाय फरफटायला, अंगावर धूळ आली ना ?

येरवी मी तिची धूळ झटकून दिली असती. पण शाळेत अपमान ? मी फार चिडलो. म्हणालो- एवढी कुठं अप्सरा लागून गेली आहेस ?"

तिच्या तोंडाचा पट्टा सारखा चालूच होता. फार फटकळ. एखादेवेळी तोफेच्या तोंडी जाणे परवडेल.

Scanned with CamScanner

# तुझ्यात रमावे

हुर हुर वाटे
मन माझे तुटे
एकटे एकटे
तुझवीण - - - -

वृन्दावनी यावे
तुजला भेटावे
मोकळे बोलावे
तुझ्यापाशी - - - -

वेणु ही ऐकावी
रासही खेळावी
धेनु ही चाटावी
तुझ्यासंगे - - - -

राधेशी बघावे
मीरेशी भेटावे
तुझ्यात रमावे
जीवे भावे- - - -

जम्बू (उर्फ) चंद्रकांत इश्वर गोरूळे
एफ. वाय. बी ए.

# मना सज्जना-

मना सज्जना नको करू रे अभ्यास
उगी कां सायास करीतोसी

करुनी अभ्यास, कोण झाला मोठा
कशास रे खोटा कांगावा तो

ऐकरे मना धीराच्या गोष्टी चार
उपयोगी फार जीवनामध्ये

कशाला भितोस उगी परिक्षेला
कॉपी सोबतीला असू द्यावी

तुला नाही होत अभ्यास रे जेंव्हा
ड्रॉप घ्यावा तेव्हा निश्चितपणे

कॉलजचे जिणे नाही पुन्हा येत
मजा मनसोक्त करावी रे

जरी झाला दन्ड नको जाऊस भिऊन
महत्मा शिक्षेविणा कोण झाला

मना सज्जना, झाला उपदेश माझा
आता दाखवी तुझा पुरुषार्थ तो

पी. डी. पोवार
B. Com. III

# लगीन

लेखक- श्यामलाकांत गवस
प्रथम वर्ष साहित्य
बी. ए. आय. बी.

नुगत्याच दाराबाहेर पडलेल्या खन्डू बोरकाडचाला बघून धोंड्या चपापला.

' आयला ! नव्हं त्या येळंला येंतु म्हणूशान दत्त असतुंय. त्या दिवशी फजिती केली माझी. आनी पोरबी बातरट! मागन पळता भुई नकावडी झाली. कच्या नक्षत्रावर जलामलाय कायकी लेकाचा. कायबी काम नेमतुंय भला, आनी ह्यो घुबडागत लांबनचं घुब्बुऽऽल करतोय भला. म्हातारडा झालाय पन तरण्या पोरीगत चालतोय. आत्ता आनी कशाला आलात कुणाला धक्कल' धोंड्या मनासीच पुटपुटत व्हता. मोडक्या चौकटीन जर धडक मारली नसती तर किती उशीर बडबडला असता कुणाला ठाऊक. डोक्चं चोळता चोळता धोंड्या म्हटला ' बा, खंड्या म्हातारा का आल्ता- - - - ? '

' आरं लेका, गाडवा एवढा झालास पर कसं बोलावं, वागावं, कसं चलावं हेच समजत नाय तुला. आता बायकू केली तर उद्याला चार पोरांचा बा व्हसील. कवा अक्काल यायची तुला- - - - ? ' दाराला टेकून बसल्याला म्हातारीनं मधीच त्वांड खुपसलं.

' तुला तरी अक्काल हाय म्हातारी, ? आनी येकादया येळी असती तर बरबरीच्या पोराला असं म्हणतीस - - - ? ' धोंड्या जरा हसतच म्हणाला.

' तसं नव्ह लेका, खन्डूदा आल्ता त्यो तुझ्याच लगनाच्या इंच्यारपूसीसाठी, असली माणस पावलाला उप्पेकी पडतात; असं वंगाळ बोलू ने, खन्डूदाची केसं पिकली तरीबी त्येला खन्डचा म्हणतोस- - - - ? ' म्हातारी समजायला गेली पन धोंड्या खवताळला. लगनाची गोष्ट काढल्या काढल्या त्यो पिसाळलेल्या कुत्र्यागत खेसकला.

' म्यां हजारदा बोंबलून सांगतुय लगीन करून घीत नाय म्हणूनशान तरीबी त्या घुबडाचं ऐकतीस ? अस्सा व्हणार म्यां ! '

' मग हांटचां त्या किसनीची कळ का काढलातास् ?' म्हातारी किंचाळली. त्या सरसी धोंड्या गप्पगार झाला ! आनी मनातल्या मनात म्हटला–

' च्यायला म्हाताऱ्यानं कवा सांगितलंय वाटतं; त्येच पेकाट मोडल्या बिगर त्यो गप नाय व्हायचा. ' आनी लगेच वटवट करत्याल्या म्हातारीला म्हणाला ' कशाला येडाला ख्वॉड आन् जात्याला प्याड लावाय लागलीस ? ' या धोंड्याच्या माघारीसाठी आन् मागेची वल बघूशान म्हातारी म्हणाली ' बाबा धोंडिबा, माझ्या शाण्या लेका, लवकर लगीन करून घेरं. लेका, आमच्या शेणी आता वड्यावर गेल्याती. आज हांय तर उद्याला नाय. पिकल्या झाडाचं पान कवाबी गळायचंच. तवा डोळ्यासमुर एकदाच तांदूळ पडू देत. तुझं लगीन झालं की, खुशाल मरायला रिकामी झालो बघ ! '

Scanned with CamScanner

'आर, चार खेड्यातं हात धरणारा माझ्या बरुबरं उठत नाय. लगीन केल्यावर तुरकाटी पैलवान व्हईन म्हाईत हाय- - - ? ' धोंड्या.

' इस्तू पडला तुझ्या पैलवानकीवर, माझी हाडं जायालागल्यात काशी रामेसूरला आनी हचो पैलवानकी करतोय मसणाची. म्हातारीनं त्वांड चालू केलं आनी धातापत्तर घुम्यागत गप्प बसलेला म्हातारा भसाड्या आवाजात बोलला, 'धोंड्या, नाम्या कूऱ्यागत लगीन करून घे नायतर झाडाला बांधूनशान तांदूळ टाकू' धोंड्या दगडच न्हायला. काय म्हणाव हयेच त्येला समजचंना. आगाव बोलाव म्हणून म्हटला. 'बायला समदं घरदारच माझ्या हातधुवून पाठी लागलंय' या उप्पर म्हातारी तनतनत उठली, 'आरं हयेचं मडं बसीवलं- - - तुला लगीन करून घे म्हटलं म्हणजे काय केलंरं तुला— कसली पाठ घेतली तुझी- - - - - ? ' धोंड्या गडबडीत म्हणाला 'म्हातारी, म्हातारी तुला काय सांगू- - - - ? ' आता ह्यो कायबी सांगतोय कायकी म्हणून म्हातारी हळूच इचारती कशी 'काय-रं धोंडबा- - - -? काय सांगतुंस- - -? '

' म्हातारी आज माझं मडं बसवालीस, उद्याला माझ्या धोंड्यारं ऽऽ म्हणून लागसील हाणूनबडवून घ्यायला '

' अरं माझ्या सुडक्या ऽऽ ' धोंड्या हासतच बाहेर पळाला.

धोंड्या नावासारखा आडदांड खरा पन गमतीला आला की बारक्या पोरासंगट लोळायला बी मागपुढं बघायचा नाही रागात आला की कुणाच्या बाला ऐकायचा नाही. गावतली माणसं त्येला लक्ष्मीचा बळू म्हणून माघारी मन समाधानी करीत. नाकारुपानं देखणा नव्हता खरं आवाजानं मजेशीर व्हता.सहज जरी बोलला तरी लोक उफडी पडून हसत असायची.

धोंड्या घराबाहीर पडला खरं पन मन मातुर धांगडधिंगाना घालत व्हतं. चलगे त्याला गावातील चार बाप्यानी केलेली थट्टा आठवली. त्ये बोलनं त्येच्या काळजात रुतलं व्हतं. घडीबर आत्तापर्यंत केलेल्या सगळ्या भानगडींची याद आल्यावर मग जरा लाजला.

धोंड्या माझा जिग्री दोस्त. म्यां दरदिसीसारखं त्येच्या घराला गेलू तवा म्हातारीनं लगनाचं पान काढलं. म्यां डोळं झाकून होकार दिला. लगनाची तड-जोड करण्याचं वचन सुदिक ! धोंड्याचं लगीन ठरतंय. हे समजल्यावर सगळं गाव मजेत व्हतं. 'बरं झालं. देव पावला. धोंड्याचं लगीन म्हणजे बैलाच्या नाकात येसण ! ' आत्तातरी सुद्दीवर ईल, भानगडी करणार न्हाई ! ' सगळ्यांनी सुरातसूर मिसळून बोलायला सुरघात केली. एक बरा दिस बघून सताठमंडळी जावून नवरी बघून आली. धोंड्यालाही नवरी बघून यायला सांगितलं; पन त्येनं हसण्यावरच घालिवलं. 'हसतोस काय धोंड्या- - - -? ' बन्डूदा

' आगा, तुमी बघितला काय नी म्यां बघितलं काय सारखं नव्हं ? '

' आरं, बायकू तुला करायचीय आमाला नव्हं. नीट बघूशान करून घे, न्हायतर उद्याला आमचं खोपाट जाळायला रिक्कामा व्हसील- - - ' बन्डूदा यावर तो मुसकं घातलेल्या जनावरागत गप्प न्हायला. धोंड्याला दाव्याला बांधलेल्या जनावरागत म्यां खेचून बायकू बघायला बाहीर काढला. घरातल्यानं नी त्येचं छत्तीस. म्हातारीनबी लई मिणत्या केल्या. आणी धोंड्या नवरी बघायला जायाला तयार झाला. पण मधीच माशी टॅशकन् शिकली. कारण ऐनवेळी न्हाव्यानं केलेली चंपी धोंड्याला घातक ठरली म्हणत्यात नव्हं भट्टाच्या लगनाला शेंडीपासनं तयारी! चांगलं कोंबडापाडण्या इतपत लांब केस येईपतर हा बेत फेटाळून लावला. धोंड्याच्या चंपीवर त्याल लावलं की दिसाच्या किरणानं अशी चकाकायची म्हणता, शाळकारी पोर हशी परकाशाच्या परावरतनाचं सगळं नियम आठवायचं.

अखेरीला नवरी बघायला जाण्यास आमी निघालो पन धोंड्याच्या तोंडाकड बघितल्यावर तरारून उठलेल्या हायब्रीड जुंधळ्यासारखी दाडी वाटली. म्यां मुल्लाण्यावानी वाढलेली दाडी खरडून टाकायला सांगितली, तवा कुठं त्येनं तोंडावरनं हात फिरिवला! पण माझ्यावर चिडून हात फिरिवला की काय? म्हणून म्यां मनातल्या मनात चराकलू भर दुगरच्या येळी ह्यो

म्हाव्याकडं गेला. म्हाव्यानं ताणून दिलं व्हतं. धोंड्यानं त्याला उठविलं. दरडावुन सांगितलं.''झॅक पैकी तलवार कठ मिशांचा व्हयाला पायजे, दाडीतरी तुळतुळीत!'' पन म्हाव्याच्या डोळयात झोप व्हती. तलवार कटाचा सरळकट कवा झाला म्हाईतच न्हाई. धोंड्या माझ्या- पुढं येवून दाबात म्हटला ''कसा काय तलवार कट--?'' त्या गुळगुळीत चेहऱ्याकडं बघून प्वॉटभर हसणार पन नसती ब्याद पाठीलागली तर काय करू? म्हणूनशान म्हटलं ''येहे, झक्कास मारलाय बुवा''- लगेच त्याने ''म्हंजे!'' म्हणत मिशीवर ताव मारला पंण तलवार कट हाताला लागलाच ''न्हाई!!'' त्या सरशी जरा आवाज चढवून म्हणाला ''च्यायला! मिशा राखल्यात का न्हाई रं? तो आरशात बघणार इतक्यात म्यां दूसरच काम लावलं.

आमी जाण्यास निघालू. लगेच म्हातारी बोलली "आरं धोंडिबा, न्हाव्याच्या पुढयातनं बसून आलास लेका, अंघुळतरी कर" धोंड्या भुईवर पाऊल आपटीत वराडला ''तिचीभण! मोडा घातल्या बिगर कुठलं काम न्हाई!!" आल्याला सगळा राग चिडून काळ्या कातडीवर काढला पन रगात आल्याखेरीज कायबी झालं न्हाई. सगळं आटपून दोघं गडबडीनं चाललो एवढ्यात आडामोडा घालीत खंड्या बोरकाड्या आला. "कुठं चालल्यासारं पोरानू - - -?" "म्हाताऱ्या, मूळ मुहुर्तावर 'फुठं' म्हणतोस - - ? आयला आजचाबो दिस काय बरूबरं न्हाई!!" म्यां जरा मारक्या रेड्यागत टवकारून म्हटलो. खंड्यामातूर गप्पगार पडला.

अेकदाचं इचारत, इचारत नवरीच्या घराला पोचलू. अधिच धोंड्याचा उल्हास त्यात उन्हाचा फालगून मास! त्यामुळं आमची तोंडं नुकतच मडं पोच- वून आल्या सारखं झालंती. सारी माझ्याकडंच टकाटक बघत व्हती, याचं उत्तर मागनं चांगलंच समजलं.
परत येताना गावच्या पांदीला किसनी गाठ पडली. धोंड्याला बघून हसली. म्हणती कशी ' काय फैना हाय नवं मालकीन ? काखंतन न्हेती की न्हाई- - -? ' तिच्या वाकड्या त्वांड करून बोलण्यावर म्यां म्हटंलं. ' धोंड्याला भिंगरी फिरविल्यागत फिरविल! '

साखरसाडी झाली. म्यां धोंड्यासंगट एकदासुदिक भांडलू न्हाई. याच्या अगोदर मात्र मोठमोठ्या गुद्यांनी आंग रगडत असू. पन कशात तरी वाकडं आलंतर आयता करवल्याचा मान हुकला जाईल म्हणून सारं बंद! नवरा, नवरीचं लगीन तर करवला करवलीचं निराळंच असतंय ते ! !

उद्या लगीन ! गाड्या जुपल्या. पटकं बाहीर पडलं, घुंगुरं वाजू लागलं. वऱ्हाड नवरीच्या इकडं धावू लागलं. धोंड्यावर सक्त पहार ठेवण्यात आला. (लग्नाच्या आदल्याच दिसी पळून जाईन म्हणूनशान धोंड्या चोरून किसनीला बोलला व्हता. तिनं केलं गावभर ! चोरून पोळी खा, म्हणतानं बोंबलून गुळ- वणी मागतो म्हटल्यासारखं झालं.)

लगीन घटका जवळ येऊ लागली. धोंड्याच्या छाताडात धडाऽक धडाऽक व्हवू लागलं. घामनं डबडबून निघाला. घसा कोरडा पडू लागला भरमसाठ पाणी मागू लागला. पन ऐनयेळी प्वॉट फुटलं तर काय करूं म्हणून म्यां जीगूपना करूं लागलो. ( खरं सांगायचं म्हणजे पाणीच कोण देईना) हळद लागायच्या आतच ही तऱ्हा! लगेच बायका जमल्या. हळद लावू लागल्या. ' जिर- साळी तांदूळ । ताटिया वळवा । आजीला वोलवा । हळद लावू ।।१।। ' ' आजी ' ही अक्सरं धोंड्याच्या कानात गोळीगत (लिमलेट, चॉकलेटच्या नव्हे) घुसली आनी देवाघरी गेलेल्या आठवणीने तो मोठयांदा रडू लागला- - - - ! त्येचं बघून म्यां बी डोळं पुसलं.

धोंड्या भ्याला. त त् फ् फ् करू लागला. बायकांच्या गराड्यातून घाम पुसीत वाऱ्याला आलो. नवरीबी कशाला बाहेर आलती कुणाला ठावं- - - - तिनं त्याला बघितलं. आनी मायपसी जावून कायबी वाईट वंगाळ बोलू लागली. ' लगीन लागायच्या आत मला भावीत ढकल चल... नवरा बदललाय 'झाल. एकच गोंधळ. नवरा बदलला पळापळ सुरू झाली. नव- रीचा बाप ठिसक्या मांजरागत खेसकला मिशीवर पीळ भरत म्हटला ' लेको, असं म्हाईत असतं तर तुमचं चांगलंच लगिन लावलं असतं. कुठं हाय खरा ' नवरा- - - - -? ' एवढ्यात दोघीतिघी बायका पुढं



Scanned with CamScanner

आल्या. मला टराटरा ओढलं. म्यां सैल झालेली चड्डी वर चढवता चढवता लोडण्यागत फरफटत गेलूं. त्या म्हटल्या.

' ह्यो बघा पयला नवरा- - - - '

काय झालं कळायच्या आत टोणं, कुराडी बाहीर पडलं. दोघांनी माझी मानगूट पकडली. ही संधी साधताच धोंड्यानं हळदीची कपडं उप्परण्या सकट माझ्याकडं भिरकावली आनी म्हणतोय कसा "व्हय, व्हय पाव्हणं हृयेलाच पहिल्यांदा बायकूं ठरलीती!" सगळी माझ्याकडं कुक्कुडकुंब्या गत डोळ करून बघू लागली. चक्क पळून जावं असं वाटलं. पण- –पण – – मला दोघांनी गच्च धरलं होतं नवं - - - ? म्या रडकुंडीच्या घाईला आलो! पाया पडतू म्हटलं पन सुटका व्हायचा बेत दिसंना. धोंड्या मात्र हळूच पुटपुटत होता. "आयला अक्षता पुरतं तरी सुटलो - - - " म्या डिवचलेल्या सापासारखं धोंड्यावर फुसक्यानं कावत म्हटलो "लेका धोंड्या फसविलास मला. आजपासून अक्कल घडविलास करवला व्हायाची – – – ! " त्यावर धोंड्या तात्रातावानं म्हटला "आरं बायकू केली म्हंजे नवरा व्हतोय नव्हरा! बायकू नव्हं!!" म्यां लई चिडलो. पन पिंजऱ्यातल्या वाघासारखं गप्पच बसलो !

